मराठी चित्रपट

*‘फास्टर फेणे’*

भा. रा. भागवत लिखित ‘फास्टर फेणे’ या पात्रावर आधारित.

लेखकः क्षितिज पटवर्धन

दिग्दर्शकः आदित्य सरपोतदार

डायलॉग्स ड्राफ्ट ५.०

1. EXT/ MIDNIGHT/ PUNE ROADS

मध्यरात्री पुण्यातला सुनसान रस्ता कापत एक बाईक सुसाट जाते. पाठीमागून आणखी एक बाईक जाते. वळणांवरुन, चढ उतारावरुन त्या दोन्ही बाईक्स जोरात जातायत, पुढच्या बाईकचा स्पीड आणखी वाढणार तेवढयात समोरुन ट्रक वळतो आणि बाईक त्याला धडकते. बाईकर उडून पडतो. त्याचं हेल्मेट घरंगळत दुसऱ्या बाजूला पडतं.

CUT TO...

## 2. EXT/ EARLY MORNING/ FOREST

पहाटेच्या वेळी जंगलात काही माणसं एका मुलाच्या मागे बोट दाखवत पळतायत. तो पाण्यातून तो वाट पार करतो. ही माणसं मागे आहेत. तो एका आडव्या फांदीवरुन उडी मारतो. आपल्याला बनेश फेणे उडी मारताना दिसतो. एका झाडापाशी येऊन थांबतो. एका पक्ष्याचा आवाज ऐकू येतो. तो वर पहातो. अतिशय उंच झाड दिसतं. तो मागच्या माणसांकडे पहातो आणि झपाझप वर चढायला लागतो. मागची चार पाच माणसं खाली येऊन पहातात. तो वर चढतोय.

१ः शिंदे परत रेस लावू नका. दमवतयं त्ये!

तो वर चढतोय आणि अंदाज घेऊन एका फांदीवर उडी मारतो. खालचे सगळे दचकतात. मुलगा फांदीवरुन वरच्या फांदीवर पायाची कात्री करतो. उलटा लटकून फांदीवर बसलेला दिसतो. सगळे श्वास रोखून पहातायत. तो उठतो आणि त्या पिल्लाच्या दिशेनी जातो. छोटं हॉर्नबिलचं जखमी पिल्लू दिसतं, त्याला एका हातानं जवळं घेतलं जातं. मागची फांदी बाजूला केली जाते आणि टोकाच्या फांदीवर सूर्यप्रकाशाच्या वलयामध्ये पिल्लू घेऊन हसणारा १९ वर्षाचा बनेश फेणे दिसतो. खालनं सगळे टाळया वाजवतात.

१ः कुठंबी घुसतंय त्ये! मागच्या पुरात नदीतनं गाय काढली शेपटाला धरून (मोठयानी) अरं, भिती नाही वाटत का तुला बन्या?

बनेशः (हसत) टॉक्क! नो फिअर!

मोबाईल काढून सेल्फी घेणार तेवढयात बॅटी ड्रेन होते. तो त्या पिल्लाकडे बघतो.

बनेशः चोच, सॉरी हां! फोन चांगला आहे, पण मीच चार्जिंग करायचं विसरतो. टेस्ट म्हणून परवा बादलीत बुडवून पण पाहीला, पण खरंच वॉटरप्रुफ निघाला. (हसतो.) जाऊया का खाली? का राहूया इथेच?

CUT TO...

## 2A. EXT/ AFTER SUNRISE/ FOREST

पिल्लू त्या लोकांच्या ताब्यात दिलं जातं.

बनेशः आता फॉरेस्ट डिपार्टमेंटची जबाबदारी आहे ही! मी पुण्याला चाललोय महिनाभर.

१: आयला तोवर अजून कुणी अडाकलं तर?

बनेशः शिंदे, एक काम करुयात का? मी थांबतो इथं, तुम्ही जा पुण्याला एन्ट्रन्स दयायला. (सगळे हसतात.) तसंही मला शहरापेक्षा जंगल आणि माणसांपेक्षा प्राणी आपलेसे वाटतात! परिक्षा झाल्याच्या दिवशी मी बॅक टू पॅव्हेलियन येणारे!

(सगळे पाठमोरे चालत जाताना दिसतात.)

(व्ही ओ.) शिंदे, काय मुलाचे शूज का? तुमच्या स्पीड स्लो होता. म्हणलं शूज मोठया साईज चे घातलेले दिसतायत.

CUT TO...

## 3. INT/ DAY/ HOME CORRIDOR

बनेश्वर मधलं घर दिसतं. बाहेर एक सायकल ठेवलेली. त्याच्या आजूबाजूला कुत्री खेळतायत.

कॉरीडॉरमध्ये बनेशची आई मोबाईलवर खटपट करताना दिसते, तो समोर येतो. मागे एक सॅक पुढे दोन बॅगा. आई टेन्स्ड होऊन त्याच्याकडे पहाते.

आईः निघालास? ऐकना जायच्या आधी एकच महत्वाचं काम करशील? माहेर कडच्यांचा ग्रुप करायचाय व्हॉटसॲपवर. मावशीनी करायच्या आत मला करायचाय. प्लीज.

बनेशः (फोन हातात घेतो.)

आईः डाव्या कप्प्यात डबा आहे. पुढे दोन चिवडयाची पाकीटं, इकडे आंबे आणि थोडे तांदूळ पण आहेत. चार्जर हरवलास तर याद राख आणि प्लॅस्टिकच्या पिशवीतल्या ओल्या चडडया कोरडया

बनेशः झाल्या

आईः काय?

बनेशः व्हॉटसअप ग्रुप वर सगळया मावशा ॲड झाल्या. (फोन हातात देतो.)

आईः कधी कधी मलाच आश्चर्य वाटतं तुझी हुशारी बघून!

(बनेश लाजून नमस्कार करायला वाकतो. तेवढयात सॅकमधून एक वस्तू दोघांच्या मधोमध खाली पडते. आई त्याच्याकडे पहाते. बाहेर कुत्र्यांचं भुंकणं ऐकू येतं.)

आईः हे काय आहे?

बनेशः (आवंढा गिळत) घरगुती धनुष्य. तुझ्या साडीच्या हँगर पासनं तयार केलं होतं.

आईः (हसत) अरे व्वा! काय सरांना पेपर दिल्यावर मारणार वाटतं?

(बॅग काढली जाते. टेबलावर दहा बारा शस्त्र काढलेली दिसतात.)

आईः बास ना आता. नको आता कुठलेही उपदव्याप. कळतंय ना मी का सांगतेय ते?

(बनेश मान डोलावतो. वळतो. वडलांचा फोटो दिसतो. नमस्कार करतो.)

(दार उघडतं, बनेश सायकल घेऊन बाहेर पडतो. कुत्री त्याच्या बरोबर आहेत.)

आईः नीट रहा त्यांच्याकडे, मोठे लेखक आहेत ते. त्यांच्या पेनाबिनाला हात लावू नकोस. पत्ता लक्षात आहे ना?

बनेशः (हसतो.) हो. भा. रा. भागवत ७३४, डेक्कन जिमखाना.

बनेश तीन चार कुत्र्यांसोबत बाहेर पडताना दिसतो.

आईः (व्ही ओ.) गाढवा, माहेरची साडी नाव ठेवलंस ग्रुपचं!

बनेश वळून हसतो आणि बाहेर निघून जातो.

CUT TO...

## 4. INT/ DAY/ NEWSPAPER OFFICE

न्यूजपेपरचं ऑफीस दिसतं. पेपरमधला किम कार्डेशियनच्या चेहरा दिसतो आणि समोर तशीच एक बाई नटून थटून बसलेली आहे. तिच्यासमोर एक १९ वर्षाची स्मार्ट मुलगी उत्साहाने बसलेली. बाई ऑनलाईन मेकअप रेंज चेक करतीये.

अबोलीः मला नुसतं जर्नालिझम नाही. क्राईम बीट करायचंय.

बाईः मुलींनी क्राईम बीमच्या फंदात पडू नये. तू फॅशन कर. तुला तेवढचं झेपेल.

अबोलीः बाबा म्हणाले पत्रकारानं समाजाचा खरा चेहरा दाखवावा!

बाईः (हसत) बाबांना सांग, असा खरा चेहरा वगैरे काही नसतं!

अबोलीः तुम्ही आणि तुमचा पेपर सेमच आहात हो. फक्त मेकअप आहे चेहराच नाही.

बाईः काय??

अबोलीः मग काय? ही किम कार्डेशिअन शिंकली तरी तिचे फोटो टाकता, इथं शहरात काय घडतं माहीतीये का? मेकअप करुन बोलताय चुटूचूटु!

बाईः माईंड युअर लँग्वेज!

अबोलीः मी का माईंड? मला नाही हो ला हो करता येत, दयायची तर दया इंटर्नशिप नाहीतर माझा ब्लॉग झिंदाबाद. तसंही तुमच सर्क्युलेशन डाऊनच होत चाललंय. दोन वर्षात सेमच सबस्क्राईबर्स होणार आपले. स्टाफ बारा ने कमी झालाय, चीफएडीटरला बाहेर ऑफर आहेत आणि एक प्लँट बंद व्हायच्या मार्गावर आहे, तुम्हाला चेंजची गरज आहे आणि मला ब्रेकची. हुशार असतात तर एव्हाना दिला असता जॉब.

(बाई अवाक होऊन तिच्याकडे पहाते. साईट बंद करते आणि हसायला लागते.)

बाईः ए आवडलीस तू मला. (थांबून) १२ हजार, नो कॉन्ट्रॅक्ट, एज्युकेशन बीट.

अबोलीः मला क्राईम करायचंय.

बाईः अच्छा? एज्युकेशन मध्ये क्राईम नसतो असं कुणी सांगितलं तुला?

अबोली तिच्याकडे पाहून सूचक हसते. तिच्या चेहऱ्यावरच कँडी क्रशचे आवाज यायला लागतात.

CUT TO...

5. EXT/ AFTERNOON/ RESTAURENT PUNE

एका रेस्टॉरेंटमध्ये वडील आणि मुलगा समोर बसलेले आहेत.

वडीलः उसने बोला पूना मे ॲडमिशन हो जायेगा, पंद्रा मे. इसलिये आपसे फोन होने के बाद भी उधर गया में.

समोर एक सहा फुटी आडदांड माणूस बसलाय. हा दत्ताभाऊ. फोन काढतो.

दत्ताभाऊः ये था ना?

वडीलः (फोटो पाहून) हां. जावळकर.

दत्ताभाऊः वो बिफोर था. ये आफ्टर देखो.

त्याच माणसाचं डोकं फुटलेला आणि हात तुटलेला फोटो दिसतो. वडील घाबरतात.

दत्ताभाऊः अप्पा म्हणले जेवढा कोट दिलाय तेवढाच धन्यवाद दया. पंधरा दिला म्हणून वाचला. पंचवीस बोलला असता तर खलासच झाला असता.

शेजारच्याकडे बघून हसतो. शेजारचा खेळता खेळता हसतो.

वडीलः अप्पा को बोलो ना? बीस? पच्चीस? पुण्यातच शिकायचंय!

एवढयात शेजारनं एक मुलगा येतो. आणि सगळयांना पेढे देतो. शेजारचा माणूस

माणूसः गोड नको.

दत्ताभाऊः याला एम बी ए केला आपण.

वडीलः (आश्चर्याने) आप मॅनेजमेंट भी करते हो?

दत्ताभाऊः हां. राईट मे मॅनेजमेंट, लेफ्ट में इजीनिअरिंग, तिकडं गर्वमेंट जॉब्स, आणि इकडं ज्युनिअर केजी ते ज्युनिअर कॉलेज! अप्पा म्हणतात एज्युकेशन मॉल पाहीजे आपला! वन स्टॉप सोल्यूशन!

कॅमेरा वर जातो तसं आख्खं हॉटेल दिसतं. सगळीकडे मुलं आणि पालक बसलेले आहेत. निगोसिएशन्स चालू आहेत.

मेहताः आख्खी सिस्टीमच आहे तुमची. पण हे अप्पा येत नाहीत का?

दत्ताभाऊः आलेत की (शेजारी हात दाखवत) हे काय!?

कँडी क्रश खेळणारा माणूस दिसतो. ते दोघे त्याच्याकडे पहातात. पहिल्यांदा अप्पा दिसतो, चाळीशीचा, करडा, लिनन शर्ट, साधी पँट, शर्टात मोठं पेन. लेवल पूर्ण करतो. हसून फोन ठेवतो.

वडीलः सॉरी हां आप बैठे थे और आपको पहचाना नही.

अप्पाः हुशार माणसं आपली ओळख कामानी करुन देतात, नावानी नाही! (मुलाला) पस्तीस. नायतर पुण्याच्या बाहेर अॅडमिशन.

मुलगाः पस्तीस? टू मच!

अप्पाः आठ आण्यात करु का मग? (पैसे काढतो.) ए पिंटया, जा समोर मॅकडी मधनं पन्नासचा बर्गर एकोणपन्नास ला आणून दाखव, जा. तिथं सांगतो का कमी करायला? (दोघे गप्प होऊन पहातात. त्याच्याकडे पहात) साठ हजाराचा फोन, दीड लाखाचं घडयाळ, आणि चाळीस लाखाची कार! पैसा आणि पोट या दोन गोष्टी अशा आहेत की बाहेर आल्या की लगेच दिसतात! पस्तीस! डॉट! नायतर हीच अॅडमिशन एक वर्षानी केबिनमध्ये बसून सत्तर मध्ये करायला लावणार मी.

मेहताः अॅडवान्स?

अप्पाः वीस. आणि दोन नवीन शूज!

दत्ताभाऊः अप्पाला शूजचं लई वेड आहे. शर्ट जुना घालल पण शूज नवीन!

अप्पाः दत्ता सगळयांचेच पाय मातीचे आहेत, मग आपण किमान शूज तरी चांगले घालावेत! दया पाठवून. करु ॲडमिशन. ए ग्रेड कॉलेजमध्ये.

अप्पाचा फोन वाजतो. तो फोन घेतो. त्याचे नवीन कोरे शूज दिसतात.

CUT TO...

6. EXT/ AFTERNOON/ AAJOBA BUNGLOW

चिखलात माखलेले शूज दिसतात. बनेश आजोबांच्या बंगल्याबाहेर उभा दिसतो. समोर एका मोठया पाटीवर सात भाषांमध्ये ‘हा बंगला विकायला अगर भाडयाने दयायचा नाही’ असं लिहीलेलं दिसतं, त्याच्या खाली बी. बी. लिहीलंय.
बनेश फोटो काढतो आणि ‘इट हॅपन्स ओन्ली इन पुणे’ असं इन्स्टाग्राम वर पोस्ट करतो.

बंगल्याच्या दाराशी एक मोठठा दार नसलेला पिंजरा दिसतो. तो चकीत होतो. आत येऊन दार ढकलतो तर एक सत्तरीचे आजोबा चिडून फोन टेबलावर आपटतात. बनेश इकडे तिकडे संशयाने पहातो. काही कागद जमीनीवर पडलेले.

बनेशः (डोळे चमकतात) ओ हो! चोरी झालीये?

आजोबाः (त्याच्याकडे पहात) तू कोणेस?

बनेशः बनेश फेणे, (पहात) मी शोधून देऊ? मला जाम आवडतं असलं काय काय करायला!

आजोबाः हां, भालेराव म्हणले होते, उचापती बनेश येईल. पण ही काही शाळेतली पेन्सिल चोरी नाहीये.

बनेशः हं, (भिंतीकडे पहात) दोन पेंटीग्स, दोन मूर्त्या, आणि एक पेन गेलंय ना? (फॅन फुल स्पीडवर दिसतो. तो कागदांकडे पहात) तुम्ही लिहीत होतात का?

आजोबाः बसलो होतो बऱ्याच दिवसांनी पण सरस्वती देवींचा मूड नव्हता आजही. त्या नाराज आहेत आमच्यावर. लिहायला बसायचं नुसतं ठरवलं तरी तब्ब्येत, मूड किंवा फोन यांना काहीतरी होतंच! त्यात ही चोरी!

बनेशः हं. (बाहेर पहातो.) रोपं नवीन का? (आजोबा मान डोलावतात. त्याला ती हलवलेली दिसतात.) वा वा, मजा येतीये!

आजोबाः उत्साही कार्यकर्त्या, तू जरा थांब, मी पोलिसांना फोन लावतोय, ते येऊन पहातील. (फोन लावतात.) अहो, इथं ७३४ मध्ये चोरी झालीये.

बनेशः जवळच्या कॉलेजच्या ग्राऊंडवर मुख्यमंत्र्याची सभा आहे, या बीटचे सगळे पोलिस तिकडे असणार. तिथून निघून इथं यायला आणि केस घ्यायला कमीत कमी तीन तास. (आजोबा फोन ठेवतात.)

आजोबाः तीन तास.

बनेशः ते यायच्या आत मी शोधून देतो.

आजोबाः तू कमिशनर वगैरे नाहीयेस ना? (तो हसतो.) काय करतोस काय?

बनेशः पळतो. (हसून चालत पाठमोरा दारापाशी जातो.) सध्या कॉमन मेडिकल एन्ट्रस ला आलोय, मग स्पोर्टस न्यूट्रीशन, मी यूटयूब वरुन फॉरेन्सिक आणि केमिकल्स बददल शिकतोय, लॉ माझ्या आवडीचा विषय आहे आणि मनापासनं विचाराल तर मला ज्वारीची शेती करायचीये. एका आयुष्यात एकच करीअर करायचे दिवस संपले. आजकाल सगळं मॉडीफाय करता येतं, करीअर पण आणि सायकल पण.

(बाहेर पोचलेला आहे. मॉडीफाईड सायकल दिसते. आजोब चक्रावून पहातात. तो घडयाळात तीन तास टाईम सेट करतो.)

आजोबाः सावकाश जा!

बनेशः नो वरीज!

CUT TO...

6A. EXT/ AFTERNOON/ AAJOBA BUNGLOW

हलवलेल्या रोपांच्या इथे खाली पहातो. त्याला चिखलामध्ये बुटांचा ठसा दिसतो. फोटो काढून अॅप मध्ये टाकतो. त्यात स्कूल शूज, साईज ६.

बनेशः (पुटपुटत.) शाळेतला पोरगा. अराऊंड सातवी आठवी.

6B. EXT/ AFTERNOON/ AAJOBA BUNGLOW

बनेश सायकल वळवतो. बाहेरच्या भिंतीपाशी येतो. भिंतीजवळचा मार्कपहातो. वास घेतो.

बनेशः बिडी. (उजवीकडे पहातो. गुटख्याचा पॅच दिसतो.) या देशातले निम्मे चोर अस्वच्छतेमुळे पकडले जाणारेत. (झटकन काहीतरी लक्षात येत.) रिक्षा!! (कोपऱ्यात पहातो एक चाळीशीचा वॉचमन संध्यानंद वाचतोय.)

बनेशः भागवत आजोबांच्या बंगल्यात कोणाला येताना पाहीलं का?

वॉचमनः मी यांचा वॉचमन आहे, त्यांचा नाही.

बनेशः (स्वतःशी) आत्ता पुण्यात आल्यासारखं वाटलं. (त्याला) इथं रिक्षातनं एक जण आले होते मघाशी, पत्ता सापडला नाही म्हणून परत गेले लगेच.

वॉचमनः काय ढाका टाकताय? रिक्षातनं एक माणूस आणि एक पोरगा आले. मी जेवायला गेलो, तेव्हा पोरगा आत गेला. बाहेर आलो तेव्हा त्या मुलाला घ्यून गेला. हातात पँटीन पन होतं!

बनेश कपाळावर हात मारतो. तेवढयात ओ वॉव असा आवाज येतो. वर एक मुलगी सेल्फी घेताना दिसते.

वॉचमनः शाळीग्राम बाईंच्या पोरीचं हेच चाललंय दोन तास झाले!

(बनेश तिच्याकडे पहातो, गेटकडे पहातो झुंबा क्लासेस, नेत्रा शाळीग्राम असा बोर्ड दिसतो. डोळे चमकतात तो इन्स्टाग्राम उघडतो. नेत्रा शाळीग्राम प्रोफाईल उघडतो. सेल्फी पहातो. स्नॅपशॉट घेतो. झूम करतो. तिच्या सेल्फीमागे रिक्षा दिसते त्यात एक मुलगा बसलेला. खाकी चडडी, गुलाबी शर्ट. बनेश हसतो.)

(दोन तीन बटणं दाबून फोन लावतो.)

बनेशः हां गजानन होजिअरी, मला सांगा गुलाबी शर्ट, खाकी पँट कुठल्या शाळेचा युनिफॉर्म आहे? म्युनिसीपाल्टीच्या ११ नंबर? नाही घ्यायचा नाही.जस्ट चौकशी (फोन ठेवला जातो.) पुण्यात आल्याची सतत जाणीव!

(हसतो. सायक्ल घेऊन तडक निघतो.)

CUT TO...

7. EXT / AFTERNOON/ SCHOOL PREMISE

जुन्या शाळेत एक पस्तीशीच्या लेडीज प्यून दिसतात.

बाईः भुषण भुस्कुटे. वडके वस्तीला, जुन्या बाजाराच्या मागं. पप्पा आधीच एक्सपायर झालते, आई सहा महिन्यामागं गेली. काय केलंय त्यानी?

बनेशः पराक्रम!

तिथून चालत जातो.

CUT TO...

8. EXT / AFTERNOON/ ROAD

नॅव्हीगेशन ऐकू येतंय.

बनेश सायकलवरुन सुसाट जुन्या बाजाराच्या दिशेनी जाताना दिसतो. घडयाळात पहातो दीड तास झालेला दिसतो.

CUT TO...

9. EXT/ DAY/ BASTI

बनेश त्या वस्तीत एका किराणा मालाच्या दुकानामध्ये उभा आहे.

बनेशः भुस्कुटे कुठे रहातात?

दुकानदार बोट दाखवतो.

(बनेश झपकन वळतो. बाहेरच्या पोत्यात हात घालतो. मूठ वळवतो. चार्ज होऊन चालत जातो.)

CUT TO...

10. EXT-INT / AFTERNOON/ BASTI HOME

बनेश धाडकन दार ढकलून आत जातो  तेवढयात त्याला दिसतं की भूषणला एक जण लाथ घालतो तो जोरात कळवळतो. एक जण समोर चिडून उभा आहे. हातात सळई.

बनसोडेः एक चोरी नीट जमना भाडकाव.

भूषणः नुसती चोरी नव्हती ती. तुम्हाला मारायचं होत म्हाताऱ्याला, म्हणून मी उडी मारली बाहेर. त्याला कापला असता हयानी अन आळ माझ्यावर आला असता.

अनिलः आम्हाला अडकवायला निघला होता भाडया. थांब सळईच घालतो तुझ्या डोक्यात!

शेजारची सळई घेऊन त्याला मारणार तेवढयात बनेश जोरात ओरडतो. ते दोघे त्याच्याकडे पहातात. बनेश हाताच्या मुठीतलं तिखट त्यांच्या चेहऱ्यावर टाकतो. दोघं जोरात ओरडतात.बनेश कॉटवर उडी मारतो भूषण ला धरतो.

बनेशः चल. सगळं घेऊन.

भूषण रडत धपाधप सगळं गोळा करतो. दोघं उडया मारतं बाहेर पडतात, मागून हे दोघं ओरडतायत. बनेश त्याला सायकलच्या पुढे बसवतो. दोघं सुटतात. मागे ही माणसं पळतायत. त्यांना चुकवत हे दोघे गल्लीच्या बाहेर येतात आणि मुख्य रस्त्यावरच्या मिरवणुकीत मिसळतात.

CUT TO...

## 11. INT / MAGIC HOUR/ BUNGLOW

दोन नाचणाऱ्या लहान मुलांचं पेंटींग ठेवलं जातं. वर मान खाली घालून भूषण उभा आहे शेजारी उत्साहाने बनेश. आजोबा आणि शेजार पाजारचे दोन चार जण अवाक होऊन पहातायत.

आजोबाः कसं??

बनेशः एल ओ एल. म्हणजे लिंक ऑफ लॉजिक! अनिल आणि बनसोडे हे भुरटया चोऱ्या करतात पुण्यात. अनिल नी तुमचा बंगला पाहीला होता आधी, परवा रोप विकायला आला आणि रेकी करुन गेला आणि याला चोरी करायला लावली. याचं काय करायचंय? मी तर म्हणतो, आता बोलवा पोलिसांना!

मुलगा घाबरुन रडायला लागतो.

मुलगाः (रडवेला) परवापासनं भूक लागली होती हो बेक्कार. त्यानी आख्खा शेजवान राईस दिला, म्हणून आलो.

बनेशः एका राईस साठी?

मुलगाः दोन वडापावसाठी एकदा ड्रेनेजची झाकणं पण काढली होती.

बनेश कपाळावर हात मारतो. आजोबा त्याच्याकडे पहातात.

आजोबाः इकडे ये! (तो नाही म्हणतो.) इकडे ये!! (तो जवळ जातो. त्याला जवळ उभा करतात.) पोलिसात पाठवलं तर हा आणखीन मोठा चोर होईल. परत वस्तीत पाठवलं तरी भूक आणि ती माणसं याची पाठ सोडणार नाही. मी तुला शिकवीन. खायला प्यायला घालीन. तू सरस्वती सदन मध्येच राहशील का?

मुलगाः हे कुठं आलं?

बनेशः (कपाळावर हात मारत) हेच!

(सगळे हसतात.)

आजोबाः काय आपलं शुभनाम?

भूषणः भूषन आहे, शाळेत दोन जणांना मारामारीत चावलो होतो. तेव्हापासनं सगळे भुभू बोलतात.

बनेश हसतो. आजोबा समोरचं पेन उचलतात आणि बनेशला देतात.

आजोबाः खरं तर तुला एखादी पदवीच दयायची आहे बन्या. पण लेखकाला सगळयात जवळचं म्हणजे पेन. हे १९४५ सालचं दुर्मिळ पेन तुझ्या हुशारीवर बहाल करावं म्हणतो. हयाने मी बारा पुस्तकं, सव्वाशे कथा, आणि आठशे लेख लिहीलेत बरं!

बनेशः परिक्षेला पुरेल ना? का नवीन रिफील टाकायला लागेल?

(सगळे हसतात.)

आजोबाः (त्याच्या पाठीवर थाप मारतात.) माझ्या मानसपुत्रा. यू आर जस्ट अमेझिंग. यू आर फास्टर दॅन आय थॉट. यू आर...

बनेश घडयाळ वर घेतो. टाईम थांबवतो. दोन तास एकोणसाठ मिनिटं झालेली असतात.

टायटल येतं, *‘फास्टर फेणे’*

CUT TO...

BG SONG 1: TITLE TRACK: (4)

BG1A: INT / NIGHT/ BUNGLOW: UPSTAIRS

आजोबाः या घराचे काही नियम आहेत. फक्त ते नक्की कुठले आहेत ते मलाच आता आठवत नाही. (हसतात.) या तुम्हाला गम्मत दाखवतो.

आजोबा वरची रुम ओपन करुन देतात. विविध ऐतिहासिक, शास्त्रीय, भौगोलिक जुन्या वस्तूंनी भरलेली खोली दिसते आणि बनेश आणि भूषण अवाक होतात.

BG1B: INT / NIGHT/ BUNGLOW: UPSTAIRS

बनेश रात्री रंगीत गोधडी घेऊन झोपतो. दुसरीकडे भुभू झोपायच्या प्रयत्नात आहे

BG1C: EXT / MORNING/ BASTI

सकाळी भुभू किराणा वाल्याला पैसे देतो. घरातलं दार बंद करतो गाठोडं घेऊन बाहेर येतो.

BG1D: EXT / AFTERNOON/ BUNGLOW

आजोबा आणि भुभू मिळून तुडवलेली रोपं परत लावतात.

भुभू: त्या पिंजऱ्याला दार का नाहीये?

आजोबाः कारण पाखरं आकाशातच चांगली दिसतात.

BG1E: EXT / MORNING/ STATIONARY SHOP

आबोली ऑफीसमध्ये काम करताना दिसते. आबोली ब्लॉग लिहीताना दिसते. “अ न्यू ॲडमिशन इन एज्युकेशन फील्ड”

BG1F: EXT-INT / ALL DAY/ EDUCATION CITY

पुण्यातला शैक्षणिक माहौल दिसतो. कॉलेजेस, कोचिंग क्लासेस, लायब्ररीज, अभ्यासिका, स्टेशनरी दुकानं, पुस्तकांच बार्गेनिंग, कॅंटीनमध्ये नोटस काढणे यात विदयार्थी दिसतायत. आबोली आबोली आर्टीकल टाईप करुन प्रिंट कमांड देते. बनेशच्या हॉल तिकीटची प्रिन्ट येताना दिसते. आबोलीला मेल येते. कॉमन मेडिकल एन्ट्रस फीडबॅक आर्टीकल. बनेश हॉल तिकीट वर पहातो साठे कॉलेज एम एफ ५४.

BG1G: INT / MORNING / BUNGLOW

सकाळी आजोबा पेपर उघडतात आज वैदयकिय प्रवेश परिक्षा. सी एम इ. २४०० जागांसाठी १ लाख ४० हजार मुलं बसणार! बनेश त्यांना नमस्कार करतो आणि सायकलवर टांग मारुन निघून जातो.

BG1 SONG ENDS.

12. EXT / DAY / COLLEGE

एक पुस्तक उघडलेलं दिसतं. सायकलींच्या रांगेसमोर एक मुलगा वाचत बसलेला दिसतो. बनेश सायकल घुसवायचा प्रयत्न करतोय. मुलगा त्याच्याकडे पहातो.

धनेशः ऐ घुसखोर, बघ तरी समोर, आख्ख्या सायकली पडल्या असत्या.

बनेशः पडल्यात का पण?

धनेशः पडेपर्यंत थांबू का मग? (एक क्षण जातो.) जाऊ दे तू तरी काय करणार? रिअल इस्टेट नायतर एज्युकेशन! दोन्हीकडं 'जागा' म्हणलं की मारामारी आलीच. १९७ पाडायचेत बाबा. मिनिमम!

बनेशः फारच छोटं एम आहे रे. मी दोनशे पाच चा विचार करतोय.

(दोघं जोरात हसतात. बेल वाजते.)

धनेशः चांगलं कॉलेज, संस्थेची स्कॉलरशिप, एज्युकेशन लोन सगळं मिळवायचंय.

बनेशः (जवळ येत) काही प्लॅन बी वगैरे काही नाही का?

धनेशः तुमच्या शहरातल्या पोरांना ए टू झेड प्लॅन असतात करीअरचे. आमच्या गावच्या पोरांना अशी एक परिक्षा म्हणजे आयुष्य बदलायची संधी असते.

(एवढयात धाड धाड धाड आवाज येतो. दोघं वळून पहातात. एकजण सायकल घुसवायला गेलाय आणि सगळया पडल्यात.  दोघं एकत्र डोक्याला हात लावतात.)

CUT TO...

12A. EXT / DAY / COLLEGE CORRIDOR

कॉरीडॉरमध्ये मागे मुलं बॅगा टाकतायत. तो बॅग टाकताना चपापतो.

धनेशः आयला कंपास विसरलो.

बनेशः नो स्ट्रेस!

(बनेश कंपॉस बॉक्स काढून देतो. तो आजोबांचचं पेन डाव्या हाताने उचलतो. बनेश एक क्षण पहातो.)

बनेशः अरे, तू लेफ्टी आहेस? (तो मान डोलावतो.) चला पुढे सांगशील बनेश फेणेच्या पेनानी डॉक्टर झालो.

धनेशः अच्छा म्हणजे तू होय. मी धनेश लांजेकर.

बनेशः काही काही लोकांना भेटून वाटतं ना आपण लहानपणापासूनचे मित्र आहोत, तसं वाटलं आत्ता! ऑल द बेस्ट.

दोघं मिठी मारतात.  बनेश हसून निघून जातो. धनेशही हसून निघून जातो.

CUT TO...

MONTAGE 2

M12B: बेल वाजते. पेपर वाटले जातात. बनेश पेपर देतोय.

M12C: बनेश आणि धनेश ब्रेक मध्ये कॉरीडॉरमध्ये भेटतात.

M12D: बनेश आणि धनेश वडापाव खातायत.

M12E: बनेश आणि धनेश पुन्हा कॉरीडॉर मध्ये उभे आहेत.

धनेश पुस्तक वाचतोच आहे.

बनेशः आता काय धडे लिहीणारेस का पुढच्या वर्षीचे? बास य झाला अभ्यास!

(पुस्तक बंद करतो आणि त्याला आत ढकलतो. तो एका मुलाला धडकतो त्याला सॉरी म्हणतो. बाहेर येतो.)

धनेशः आयला आपण एका वर्गात असतो तर बरं झालं असतं राव!

बनेश आणि तो एकमेकांकडे पाहून हसतात आणि वेगळया दिशेला जातात.

## 13. EXT / DAY / COLLEGE: CORRIDOR

बनेश पेपर देऊन बाहेर येतो. धनेशच्या दिशनी जाणार तेवढयात त्याला टॅप केलं जातं. तो वळतो. समोर आबोली उभी आहे.

अबोलीः हाय! पुणे न्यूजआर मधून आलेय, कसा होता पेपर? म्हणजे वाटतंय डॉक्टर होशील?

बनेशः माझ्या आईला आणि तपासणाऱ्यांना वाटलं पाहीजे. (ती हसते.) ऐ मी पाहीलंय का तुला कुठे आधी? (ती झपकन आयकार्ड उलटं करते.)

अबोलीः नो. हे सगळं लहानपणी करुन झालंय.

बनेशः काही जणांना भेटून वाटतं ना की आपण लहानपणापासून मित्र आहोत.

अबोलीः ऐ बेडका! गप!

बनेशः एक्सक्युजमी?

अबोलीः नायतर काय! पोरांचा ना हा प्रॉब्लेम आहे. चेहऱ्यावरच दुष्काळ दिसतो तुमच्या. रेफरन्स काढून इंट्रो, मग नंबर, व्हॉटसअप, एफबी, कॉफी, फिल्म आणि फायनली नाईट आउट. गेटपाशी दोन मुलांना तर मी डायरेक्ट नाईट आउट मारायचा का विचारलं. बुबुक्षित साले. (थांबून) बसला का झटका??

बनेशः (हसून) हसू आलं. बालभवनला माझ्या रिक्षात सेम अशी मुलगी होती एक. तेव्हा एवढी डोक्यात नाही जायची. अबोली. मला वाटलं तीच तू आहेस.

अबोलीः हो मीचे! तू कोणेस?

बनेशः मी? टॉक्क!

(आख्ख्या कॉरीडॉरमध्ये आवाज घुमतो. सगळे बघतात. ती त्याच्याकडे आश्चर्याने पहाते.)

CUT TO...

13A. EXT / EVENING / CORRIDOR (1)

(दोघं हसत हसत कोपऱ्यात उभे आहेत. मुलं चाललीयेत. बनेश इकडे तिकडे पहातोय.)

अबोलीः मी आता एज्युकेशन आणि क्राईम बीट बघते.

बनेशः शाळेत माझी खोडरबरं चोरायचीस गं तू. क्राईम बीट??

(दोघेही हसतात.) आईल्ला मला अॅक्चुली एका मित्राला भेटायचंय.
(इकडे तिकडे पहातो.) तो थांबला असेल.

अबोलीः कटवू नको. मी चाललेच आहे! फोन करते. बाय.

(ती निघून जाते बनेश वळतो. मुलं बाहेर पडतायत. तो धनेश दिसतोय का पहातो.)

CUT TO...

13B. EXT / EVENING / CYCLE STAND

बनेश सायकल स्टँडपाशी पहातो. तो दिसत नाही.

CUT TO...

13C. EXT / EVENING / URINAL

बनेश टॉयलेटमध्ये येऊन पहातो. एकजण बदामात नाव लिहीतोय. बनेश डोक्यावर हात मारुन घेतो.

CUT TO...

13D. EXT / EVENING / CORRIDOR

बनेश वर्गातून आत डोकावतो. एक सर उभे दिसतात. ते गठठा करुन निघतात.

बनेशः सर या क्लासमध्ये एक मुलगा होता धनेश लांजेकर. तो इथून बाहेरच आला नाही.

सरः आय डोन्ट नो.

बनेशः एकच कॉरीडॉर आहे. आणि तो बाहेर गेला असता तर मला दिसला असता. आठवा ना तुम्ही प्लीज, काळा सावळा, ऑरेंज शर्ट, लेफटी.

सरः हां तो, त्याला इर्मजन्सी होती. तो थोडा आधी गेला. मी जनरली सोडत नाही. पण त्यानी खूप रिक्वेस्ट केली मग मी सोडलं. सी यू!

बनेश हताश होऊन पहात रहातो. मागून सर निघून जातात.

CUT TO...

14. INT / MORNING / HOME

बाहेरच्या पडवीत बनेश ची बॅग आवरुन हातात घेतलीये. आजोबा शिवाजी महाराजांची छोटी मूर्ती देतात.

आजोबाः आपण आलात बरं वाटलं. ही निरोपाची भेट.

बनेशः (त्याकडे पहातो.) छान आहे. पण त्यानी पेन घेऊन नव्हतं जायला पाहीजे.

आजोबाः कालपासनं जप लावलाय तू! सोड! तसंही मी लिहीत नाही आता आणि ते काही महाग नव्हतं.

बनेशः मला महागडं आणि मौल्यवान यातला फरक कळतो आजोबा.

आजोबाः हो का? मग मौल्यवान वेळ चाललाय ते बघा. सात ची गाडी आहे ना?

बनेश भुभूकडे पहातो.

भुभूः स्वारगेटला चाललात ना? पाकीट पुढच्या खिशात ठेवा. पीक अवर आहे!

पिंजऱ्यातून पक्षी उडून जातो तसा बनेश हसून सायकलवर टांग मारुन निघतो. आजोबा भुभू पाठमोरे दिसत रहातात.

CUT TO...

15. EXT / MORNING / S T STAND

बनेश बसमध्ये बसलेला आहे. हातात पेपर आहे. वाचायला तिसरं पान उघडतो. बातमी दिसते. ‘प्रवेश परिक्षा अवघड गेल्यामुळे धनेश लांजेकर या विदयार्थ्याची साठये कॉलेजच्या गच्चीवरच आत्महत्या.’

बनेश ते वाचतो आणि त्याला प्रचंड धक्का बसतो. तो विचार करत रहातो. धक्यातच बाहेर पहातो आणि त्याला वाक्य ऐकू येतं, आपण एका वर्गात असतो तर किती बरं झालं असतं!

गाडीची बेल दिली जाते.

गाडी निघून जाताना दिसते.

बनेश मागे बॅग घेऊन तसाच उभा आहे.

CUT TO...

## 16. EXT / MORNING / COLLEGE

हातात बॅगा घेऊन बनेश पुन्हा कॉलेजला आलेला दिसतो. मिडीयाची एखादी गाडी बाहेर पडतेय. पोलिस खाली उतरताना दिसतात. एक चाळीशीचा इन्स्पेक्टर आणि दोन हवालदार आहेत. तो गॉगल लावून फोनवर बोलतोय.

इन्स्पेक्टरः क्लीन करुन घेतलं त्यांनी. क्लिअरकट सुसाईड दिसतीये. ओ के साहेब. (फोन ठेवतो.) ओ माने, माझे ड्रॉप आणा.

बनेशः (त्यांच्या समोर येतो.) साहेब, नमस्कार, धनेश नी सुसाईड केल्याचा काही एवीडन्स मिळालाय का? सीसीटीव्ही फूटेज, सुसाईड नोट वगैरे?

इन्स्पेक्टरः तू कोणे? जर्नालिश्ट?

बनेशः का जर्नालिस्ट नसेल तर प्रश्न विचारायचे नाही का?

इन्स्पेक्टर डोळे पुसतो. कोपऱ्यात आबोली वॉचमन चा इन्टरव्यू घेतेय.

वॉचमनः पहिल्यांदाच जिवंत डेड बॉडी पाहीली! आठ अन दहाला राऊंडला जातो हॉस्टेलला, आठच्या राऊंडला जायच्या आधी कळलं.

बनेशः हा मुलगा परिक्षेला बसायच्या आधी दोन मिनिटं मला भेटला होता आणि १९७ मार्क पाडायचेत म्हणाला होता. तो कसा करेल आत्महत्या?

इन्स्पेक्टरः तेच पडणार नाही कळलं म्हणून असलं. उगा अक्कल पाजळू नको. पर्यवेक्षक म्हणले लवकर निघाला, सीशीटव्ही मधी क्लिअरली जाताना दिसला गच्चीकडं. अन स्टोअर रुममध्ये जाऊन ब्लेड नी हात कापून घेतला.

बनेशः म्हणजे ब्लेड पाहीजे त्याच्याकडे?

इन्स्पेक्टरः सापडलाय ना.

बनेशः कसा? कारण तो कंपास विसरला होता. आणि हे फक्त मला माहीतेय!

(इन्स्पेक्टर चमकून पहातो. अबोली त्याच्या जवळ येऊन उभी रहाते.)

मानेः साहेब ड्रॉप. (त्याला बाटली देतो.) निघायचं का?

(इन्स्पेक्टर हातानीच थांबवायची खूण करतो.)

बनेशः म्हणजे जो कंपॉस बॉक्स विसरला, तो आठवणीनी ब्लेड घेऊन आला. म्हणजे त्याला आधीच इंटयूशन आलं होतं का की आपण जर समजा आत्महत्या केलीच तर ऐनवेळेला पळापळ नको.

इन्स्पेक्टरः ए, सुसाईड झालीये, जोक मारतो का त्यावर?

बनेशः ब्लेड त्यानी ठेवलेलं नाही आणलेलं नाही, समोरच्या दुकानात मिळतंही नाही. जोक तर तुम्ही मारताय, हयाला सुसाईड म्हणून! (थांबून) एकदा क्राईम सीन बघतो आणि सांगतो.

(जायला लागतो. इन्स्पेक्टर थांबवतो.)

इन्स्पेक्टरः (हसत) क्राईम सीन?? माने सगळयांना डिटेक्टीव्ह व्हायचंय! संपलं मघाशीच. आम्हाला पन जाऊ दया घरी. काल रात्रीपासनं हेच करतोय, न झोपता. त्यात डोळे आलेत.

बनेशः तरी तुम्हाला दिसत नाहीये, कमाल आहे.

इन्स्पेक्टरः (ऑफेन्ड होतो. त्याला ढकलतो.) चल माग! चल!

बनेश दोन पावलं मागे जातो. इन्स्पेक्टर ड्रॉप काढून टाकणार तेवढयात बनेश झपकन ती बाटली हातात घेतो.

बनेशः (त्याकडे पहात) जुन्या बॅचचं पॅकींग आहे हे! एक महिन्यापूर्वी एक्सपायर झालंय. याच्यापुढे तरी नीट बघून घेत जा! औषध पण आणि क्राईमसीन पण!

आय ड्रॉप फेकून समोर चालत जातो. इन्स्पेक्टर आणि हवालदार पहात राहीलेत.

CUT TO...

17. INT / EVENING / HOME

आजोबाः पण त्याच्या डोळयात अंजन घालायला तू कोणेस? पत्रकार, वकील सामाजिक कार्यकर्ता!?

तापलेला तवा बेसिन खाली धरतात, वळतात, समोर हे तिघे बसलेले.

बनेशः यातला कुणी नसलेल्या माणसानी खरं शोधायचंच नाही म्हणजे?

आजोबाः हो पण एकदाच भेटलेला मुलगा. तो काही जिवलग मित्र बित्र नव्हता.

बनेशः एखादयाबददल आपलेपणा वाटायला एक मिनिटंही पुरतो आजोबा. (भुभूकडे पहात) याला नाही लगेच ठेऊन घेतलं तुम्ही? हा कोण होता तुमचा?

आजोबाः डॉक्टर माहीत नाही, वकील नक्की होशील तू!

बनेशः एखादया गोष्टीत मी चुकलो, कमी पडलो तर मान्य आहे, पण त्यात हात घालायलाच मी घाबरलो हे नाही होणार!

अबोलीः (आदराने पहाते.) आय एम इन!

भुभूः आय एम भुभू!

आजोबाः तू जरा ऐक आधी काय म्हणतायत ते.

भुभूः दादा बोल्ले ना! बास!

आजोबाः (बनेशला) शोधमोहीमेचं ठीके पण घरी काय सांगणार?

बनेशः सांगितलं. मनशांती शिबीर आहे म्हणून थांबतोय. (जवळ जात) मला हे शोधू दया आजोबा. कारण कदाचित हे दिसतंय तितकं साधंसुधं नसणारे.

आजोबाः (त्याच्याकडे पहात) म्हणूनच मलाही काळजी वाटतेय.

CUT TO...

MONTAGE 3:

M18A. टीव्हीवर शिक्षणमंत्री एका कार्यक्रमाला आलेले दिसतात. त्यांचा सरस्वतीची मूर्ती आणि गुच्छ देऊन सत्कार केला जातो.

शिक्षणमंत्रीः आमचं मुलांना एवढंच सांगण आहे की मार्कपरत आणता येतात जीव परत आणता येत नाही. आत्महत्या हा पर्याय नाही!

रिपोर्टरः हे होते शिक्षणमंत्री मनोहर कोलते, एज्युकेशन फेअर २०१६ चं उदघाटन त्यांनी केलं.

आजोबाः त्या सरस्वती देवींची लाज ठेवा म्हणजे झालं!

बनेश लेस बांधतोय. खांदयावर बॅग टाकून त्याकडे बघत बाहेर पडतो.

M18B. सकाळी आबोली हॉस्पिटलमध्ये पोचलेली दिसते.

M18C. बनेश स्मशानात पोचलेला दिसतो.

M18D. अबोली (हॉस्पिटलच्या कोपऱ्यात उभी आहे.)

अबोलीः रिपोर्ट ढापला मी. ऐक. त्याच्या डाव्या हातावर पाच कटस आहेत.

M18E. बनेशला झपकन लेफटी आहेस ना तू वाक्य आठवतं. तेवढयात धनेशला अग्नी दिला जातो. बनेश पहात रहातो. आगीच्या ज्वाळा उठल्यात

बनेशः आबोली, जो मुलगा लेफटी होता, तो स्वतःच्याच डाव्या हातावर कटस का मारुन घेईल? इम्पॉसिबल आहे ही आत्महत्या असणं!

M18F. बनेश त्याच्या खोपटेवजा घरात जाऊन आई वडलांचं लहान भावाचं सांत्वन करुन बनेश तिथून बाहेर पडतो.

MONTAGE ENDS.

19. INT /EVENING/ BANESHWAR OFFICE

कपाल भारती करताना बनेश आणि भुभूचा फोटो दिसतो.

आईः (शेजारच्या बाईला दाखवत) गेला बाई पंधरा दिवसाचा मनशांती कोर्सला. फार चंचल आहे, म्हणून काळजी वाटते. एक एक पर्यंत झोपायचा नाही, पण गेले चार दिवस नऊ म्हणजे नऊ ला झोपतोय. फरक पडतोच हो!

CUT TO...

20. EXT /NIGHT/ COLLEGE

घडयाळात नऊ पंच्चावन्न वाजलेले दिसतात. बनेश आणि भुभू कॉलेजच्या भिंतीवरुन उडी मारतात. भुभू त्याच्याकडे पहातो आणि खूश होतो.

भुभूः च्यायला दिवसा कधी शाळेत गेलो नाही. आज तुमच्यामुळं रात्री कॉलेजमध्ये अॅडमिशन मिळाली.

बनेशः मागच्या बाजूचा सीसीटीव्ही खराब आहे. वॉचमन निघणार दहाच्या राऊंडसाठी हॉस्टेलला. तेवढयात आत जायचंय. सर्वर रुममध्ये! विदाऊट लॉक दार उघडता येतं का?

भुभूः माझा थेरी पेक्षा प्रॅक्टीकल मध्ये जास्त विश्वास आहे.

बनेश बोट दाखवतो. सर्वर रुम दिसते.

CUT TO...

20A. EXT /NIGHT/ COLLEGE corridor (1)

खिशातनं कोल्ड्रींक च्या बाटलीची फ्लॅप काढतो. दारात घालतो. दार उघडणार तेवढयात वॉचमनची शिटटी ऐकू येते. कॉरीडॉरमध्ये टॉर्च पडतो. बनेश त्याला धरतो आणि दार उघडून दोघे आत येतात. धाडकन दार लागतं. वॉचमन बाहेरुन कॉरीडॉरमध्ये टॉर्च मारतो. काहीही दिसत नाही.

CUT TO...

20B: INT /NIGHT/ SERVER ROOM

कमांड प्रॉम्प्टमध्ये जाऊन कम्प्यूटर उघडला जातो. साईन इन केलं जातं. फुटेज सुरु झालेलं दिसतं. धनेश बाहेर पडलेला दिसतो मग निळी सॅक घेऊन एक मुलगा बाहेर पडताना दिसतोय. पुन्हा पुन्हा रिवाईंड करतो काही सापडत नाही. भुभू इकडे तिकडे वायरी पहात ओढतोय.

भुभूः कॉम्प्युटर शिकायची फार इच्छा आहे मला. शाळेत सातशे जणात सहा आणले होते. बसायलाच भेटायचं नाही. त्यात नित्या वगैरे थुकी लाऊन ठेवायेच कि बोर्ड ला. कुणी हात लावू नये म्हणून.

बनेशः तू शांत बसशील का जरा?

(बटण दाबतो. पहात रहातो.)

भुभूः दादा, चला नायतर प्रिन्सिपल स्वतः यायचे लाईट लावायला.

बनेशः थांब. रिवाईंड केलंय, आता फॉरवर्ड करुन बघतो एकदा!

(एक बटण दाबतो, फुटेज दिसतं)

CUT TO...

20C: EXT /DAY/ COLLEGE CORRIDOR

CCTV FOOTAGE

वेगवेगळया कॅमेऱ्यातून धनेश कॉरीडॉरमध्ये येताना दिसतो. एकनिळी सॅक घेतलेला मुलगा त्याच्या मागे आहे. थोडया वेळाने तोच मुलगा ग्राऊंडजवळच्या कॅमेऱ्यातून उडी मारुन बाहेर पडताना दिसतो. तो एका रिक्षात जाऊन बसतो.

CUT TO...

20B: INT /NIGHT/ SERVER ROOM

बनेशः (पॉझ करतो.) भुभू अरे हे कसं लक्षात नाही आलं कोणाच्या? एक मुलगा धनेशच्या मागे गेला आणि पंधरा मिनिटानी तोच ग्राऊंडवरुन पळून बाहेर गेला.

भुभूः आयला! म्हणजे?

बनेशः म्हणजे हा मुलगा ती पंधरा मिनिटं काय करत होता? आणि तो पॅनिक होऊन का गेला? कदाचित मधल्या पंधरा मिनिटात यानी मारलं असेल धनेशला, म्हणून तो पळत गेला असेल! ओ शीट!

स्टॉप करतो. मुलगा रिक्षात बसताना दिसतो.

भुभूः नंबर घ्या! एम एच १२ टू बी ९९१८. उदया सकाळी डंपरला गाठतो. तो रिक्षांच्या मागं जाहीरातीचं काम करतो. त्याला माहीती असेल कुठे सापडेल हा रिक्षावाला.

बनेशः सापडला! अंबादास पाटील, धनकवडी.

भुभूः आँ कसा?

बनेशः आर ओ एफ एल. रिझल्ट ऑफ फाऊंड लिंक! रिक्षाच्या मागे रिव्हर्स किंग स्टीकर आहे. मी सर्च मारला उलटी रिक्षा चालवणाऱ्याबददल. गेल्या वर्षीच्या पुणे रिक्षा फॅशन शोचा विनर आहे. अंबादास पाटील धनकवडी.

पेपरातला त्याचा फोटो दिसतो.

CUT TO...

21. EXT / NIGHT/ NADI PATRA

तोच ब्लो अप होऊन अंबादास पाटील रिक्षासमोर उभा दिसतो. समोर बनेश आणि भुभू. अंबादास त्यांच्याकडे संशयाने पहातोय.

अंबादासः अंबादास नी आजवर अनेकांना पोचवलं, पण त्या मुलाला पोचवताना अंबादासला जरा टेंशन आलं होतं. अंबादासला आठवतंय ना, त्यानं टोपी घातली होती.

भुभूला हसू येतंय. बनेश हसू दाबून त्याच्याकडे पहातोय.

बनेशः अंबादासला कुठे सोडलं आठवतंय का?

अंबादासः चांगलंच, तो अंबादासला म्हणला स्वस्तिक लॉजला घ्या. लॉजवर गेलो. सामान घेतलं. अंबादास त्याला स्वारगेट ला घेऊन गेला. त्याने दोनशे दिले. अंबादास खूश झाला.

बनेशः त्याचा फोटो दाखवला तर ओळखाल?

अंबादासः अंबादास नक्की ओळखेल!

बनेशः मग चला स्वस्तिक लॉजला घ्या!

अंबादासः आत्ता जेवायची वेळ आहे अंबादासची!

भुभूः सोडा दादा, मला नाय वाटत, यांना उलटी रिक्षा वगैरे चालवता येत असेल. हयांनी या गल्लीत रिव्हर्स घेतला ना तरी मानला!

अंबादास त्याच्याकडे प्रचंड चिडून पहातो.

CUT TO...

21A. EXT / NIGHT/ NADI PATRA ROAD

भर गर्दीतनं एक उलटी रिक्षा बुंगाट जाताना दिसते. बनेश आणि भुभू जीव मुठीत धरुन बसलेत. रिक्षा धाडकन थांबते. दोघे उतरतात. समोर स्वस्तिक लॉज दिसतो. दोघे उतरतात.

भुभूः अंबादास नंबर दिल का आत्ता?

बनेश हसत पुढे जातो.

CUT TO...

# 21B. EXT-INT/ SWASTIK LODGE/ NIGHT

बनेश भिंतीवरच्या शोकेसकडे पहात पहात पुढे येतो. एक क्षण पाहतो. भुभू चालत आत येतो. काऊंटर वरचा मुलगा सॅक घेऊन बाहेर पडायच्या तयारीत.

भुभू: फोन नंबर पण उलटा सांगितला त्यानी!

बनेशः (समोरच्या मुलाकडे पहात. तो खालून वर येतो.) मनिष? आय सी कॉलेज. कमवा आणि शिका योजना. एक्साम ना? ऑल द बेस्ट!

मनिषः थँक यू.

बनेशः ऐकना माझा मित्र राहयला होता इथं.

मनिषः (बाहेर येत. गांगरुन) काय नाव?

बनेशः गुंडया. सोमवारी पेपर झाल्या झाल्या आला आणि लगेच गडबडीत निघाला. ब्लू सॅक रेड शर्ट घातला होता. बारीक एकदम.

मनिषः ओ, २०२. ते गडबडीतच गेले. पंधरा दिवस फारच अभ्यास करत होते हो. त्या दिवशी सकाळी मी विचारलं तर बोलले बऱ्याच  महिन्यानी अभ्यास करतोय.

भुभू: डेडली आहे आमचा गुंडयाभाऊ.

मनिषः बिपीन ना. बोजेवार.

बनेशः (हळूच) नाव खोटं असणारे.

भुभू: बिपन्या नीच पाठवलं आम्हाला सामान घ्यायला. राहीलंय ना?

बनेश चमकून पहातो.

मनिषः हो, ते गेले आणि कपडे आले इस्त्रीचे. फोन पण लावला, लागलाच नाही.

(मनिष शेजारच्या कपाटातनं एक शर्ट पँट काढतो. दोघं ते घेतात. बाहेर येतात.)

CUT TO...

## 21C. EXT / SWASTIK LODGE/ DAY (1)

कमवा आणि शिका योजनेचं आर्टीकल दिसतं. त्या शेजारनं मनिष बाहेर निघून जातो. बाजूला हातात शर्ट पँट घेऊन दोघं उभे आहेत. बनेश पँटचे खिसे चेक करतोय.

बनेशः तुला कसं कळलं त्याचे कपडे राहीलेत?

भुभूः एम ओ एम.

बनेशः म्हणजे?

भुभूः जाऊ दे म्हणायला भारी वाटतं. म्हणलं गडबडीत गेला म्हणजे काहीतरी राहीलं असनार. मागे कपाटात कपडयाचे ढीग होते म्हणलं टाकून बघू.

बनेश चपापतो. खिशातनं एक पाऊच बाहेर काढतो. दोघंही त्याकडे पहातात. त्यावर लिहीलंय 'मिलन डिजीटल सर्व्हीसेस.' बनेश पाकीटाच्या कोपऱ्यात पहातो. शेंदूराकडे पहात.

बनेशः शनिवारी इथून फोटो काढलेत यानी. मिलन डिजीटलला जाऊ आणि फोटो काढू याचा. भुभू, आलो आपण नेक्स्ट लेवल ला!

कँडी क्रश लेव्हल क्रॉसड चं म्युझिक वाजायला लागतं.

CUT TO...

22. EXT- INT / DAY/ CABIN (3)

एक केबिन दिसतं त्यात अप्पा बसलाय. समोर एक पन्नाशीचा माणूस आणि एक चाळीशीचा. खंडेराव आणि पारकर. टेन्स्ड वातावरण.

खंडेरावः काय शहाणपणा लावलायस? तुझ्यासारखे फडतूस एजंट खूप पाहीलेत मी. आणि आमची इन्स्टीटयूट नवीन असली म्हणून काय, वी हॅव अ रेप्युटेशन! तू परत यांना फोन ऑफर बिफर दयायची हिम्मत करच, थेट सी पी ऑफीसच दाखवतो.

अप्पाः तुमचा नंबर दया मग! तुम्हाला देतो ऑफर.

खंडेरावः हाऊ डेअर यू?

अप्पाः (हसतो.) चिडले तुम्ही! दोन वर्षात तुमच्या इथं चार बिल्डींग बांधून होईना. इन्फ्रा नीट नाही, निम्मे टीचर नाही, बेंचेस सुध्दा हलक्या क्वालीटीचे.पार्कींग धड नाही का कॅंटीन. एकदम पंच्याहत्तर अॅडमिशन आहेत माझ्याकडे. म्हणून मेसेज केला. तीन स्लॅब मध्ये करणार. पर अॅडमिशन चार लाख धरा.

पारकरः तू तर सहा म्हणला होता.

खंडेरावः अन मला पाच सांगीतले तुम्ही?

(दोघ झपकन एकमेकांकडे पहातात. अप्पा त्यांच्याकडे पहात.)

अप्पाः (हसत.) लोक इमानदार असल्याची अॅक्टींग करायला लागली की मला लई हसू येतं. तीन सी आर होतात टोटल. पाहीजेत का सी पी ऑफीसला पाठवू? तिथल्या धुरी साहेबांच्या मुलाचं पण मीच केलंय एम बी ए. ते म्हणले कुवत कमी आहे. मी म्हणलं साहेब हल्ली शिक्षणाला कुवत नाही ऐपत लागते. दोन महिने काम केलं तर पंच्याहत्तर सापडली ऐपत असलेली. वर्षभर केलं तर

किती सापडतील. त्यांची ॲडमिशन, क्लासेस, मेस, हॉस्टेल सगळं करणार मी मॅनेज. वन स्टॉप.

पारकरः आणि नापास झाले तर?

अप्पाः रिव्हॅल्यूएशन! पास करणार ना स्पेशल रेटमध्ये! आता आपली दोन माणसं चांगल्या पोस्टवर आलीयेत तिकडं. चार वर्षांनी सगळीकडे आपण शिकवलेली पोरं असणार, आणि ती आणखीन पोरं पाठवणार. आणि सगळयांना तुमच्या पुतण्यासारखा व्हॉटसॲपवर आदल्या रात्री पेपर नाही मिळत.

खंडेरावः माझं राहू दे. तुमची इच्छा काये??

अप्पाः तुम्ही मघाशी बोललात तेव्हा तुम्हाला कानफटात मारायची इच्छा झाली होती, पण म्हणलं बोलून बसत असेल तर कशाला हात वापरा! नाय का?

खंडेरावः (हात पुढं करत) सॉरी!

अप्पाः मारुन घ्या एक स्वतःला. मग ऐकीन. घ्या!

(वातावरण टेन्स्ड होतं. पारकर खंडेराव कडे पहातो.)

अप्पाः जोरात नाही हळू मारा. एकदा मारा पण. (पारकर हळूच खूण करतो. खंडेराव गालाजवळ हात नेतो. वातावरण तापतं. अप्पा जोरजोरात हसतो.) राहू दे! तुमच्या जागी असतो तर एव्हाना पोरांकडनं पैशे घेऊन बिल्डींग बांधून, कोर्सेस चालू केले असते. सगळे. अजूनही करु शकतो. कारण आज विदयार्थ्यांना शिक्षणाची नाही शिक्षणाला विदयार्थ्यांची गरज आहे, आणि ते मी आणणारे. हजारो! लाखो! कोणाच्या बापात दम नाही आपल्याला थांबवायचा!

CUT TO...

23. EXT / DAY/ MILAN DIGITAL

बनेशच्या मोबाईलवर हॉर्नबिलचा रिकव्हर झालेला फोटो दिसतो. तो चोच असा रिप्लाय करतो. मोबाईल खिशात टाकून दोघं मंडईत मिलन डिजीटल समोर येऊन उभे रहातात. बनेश आणि भुभू काऊंटर पाशी येतात. बनेश इकडे तिकडे पहातो. तेवढयात भुभू पुढे होतो.

भुभू: गेल्या आठवडयात एक पोरगा मेडिकल एन्ट्रन्सला बसला. त्यानं इथनं फोटो काढला होता. आम्ही त्याला शोधतोय.

मुलगाः असा नाय भेटत.

बनेशः ऐक. त्या मुलानं एका मुलाला परिक्षेनंतर मारलंय आणि तो पळालाय. त्यानं शनिवारी इथनं फोटो काढला होता. तू शनिवारची फोल्डर्स बघ.

मुलगा दोघांकडे पहात रहातो.

मुलगाः शोधतो. बसा दहा मिनिटं.

भुभू: नेट चालू आहे का? स्पीड काय दिलाय?

मुलगाः बघ ना आत!

दोघं आतल्या सेक्शनमध्ये जातात.

CUT TO...

23A. INT / DAY/ MILAN DIGITAL INT

जीमेल उघडलं जातं. बनेश वाकून वर उठतो.

बनेशः माझं झालं. चल तुझा इमेल आयडी बनवूया. कसा पाहीजे?

भुभूः मिडीयम घ्या.

बनेशः (हसतो.) भुभूबार्क्सअॅटजीमेल डॉटकॉम! पासवर्ड काय ठेऊ? अं तुझी सगळयात आवडती गोष्ट सांग.

भुभूः डाळ घालून कोबी लिहा. आई भारी बनवायची.

बाहेरुन आवाजः ओ फोटो बघा हे.

दोघं तडक बाहेर येतात.

दोघं काऊंटरपाशी जातात.

बनेशः (लगबगीने) मिळाला का हो?

तेवढयात मागून टॅप केलं जातं.

दत्ताभाऊः नुसता फोटो पाहीजे, फ्रेम नको का बाळा?

(दोघं वळून पहातात आणि सहा साडे सहा फुटी दत्ताभाऊंना पाहून प्रचंड घाबरतात.)

बनेशः वाटलंच!

भुभूः हा कोणे दैत्यगुरु??

दत्ताभाऊ दोघांनाही उचलतात. दोघं अक्षरशः लटकतायत. तेवढयात बनेश स्लीव मधून एक पातं काढतो आणि सरकन हातावरुन फिरवतो. दत्ताभाऊ कळवळून सोडतात, आणि ओरडतात. कोपऱ्यावरची चार पाच लोकं बघतात.

24. EXT / DAY/ MANDAI

बनेश आणि भुभू पळत सुटतात.  मागचे चोर चोर ओरडतात. बनेश आणि भुभूही चोर चोर ओरडतात. लोकांना चोर कोण आहे हेच कळत नाही.

मधोमध आणत असलेलं होर्डिंग फाडून, एक दोन ठेले उडवून, बादल्या कळशा मागे फेकून बनेश आणि भुभू एका मैदानाच्या भिंतीवरुन उडी पळत जातात.

बनेशः (आडोशाला लपून) आबोली, लोकेशन पाठवतो तिकडे ये. राडा झालाय.

मागून दत्ताभाऊ आणि त्यांची माणसं पळून जातात.

CUT TO...

25: EXT / EVENING/ POLICE STATION

इन्स्पेक्टर एक औषधाची बाटली देतो. बनेश भुभू आणि आबोली आहेत.

इन्स्पेक्टरः ए मेडिकल, हे बघ रे, जरा नीट आय का?

बनेशः (बघत) कानात इन्फेक्शन? घ्या. सर आमच्यावर पहिल्यांदा हल्ला झालाय आज.

इन्स्पेक्टरः अरे व्वा!

बनेशः (चिडून) त्या मुलाच्या आत्महत्येसंदर्भात. सर एक मुलगा आहे, ज्यानं धनेशला मारलं, आणि रिक्षात बसून स्वस्तिक लॉजला गेला. या मुलानी मिलन डिजीटलमधनं फोटो काढले होते. तिथे त्याचे फोटो मागायला गेलो तर त्याला कसं कळलं माहीत नाही त्यानी आम्हाला मारायला गुंड पाठवले. तुम्ही एकदा मिलन डिजीटलमध्ये जाऊन तपासा त्याचा आणि मिलन डिजीटलचा काय संबंध आहे?

इन्स्पेक्टरः काय बेसिस वर? उदया ड्राय डे आहे म्हणून?

भुभूः काऊंटरवरचा लई आगाऊ बोडाचा आहे. त्याला उचला आधी.

बनेशः थांबतोस??

अबोलीः पोलिसांना रेड मारायला बेसिस कधीपासनं पाहीजेत? इल्लीगल पॉर्न कंटेट, एक्साम पेपस कॉपीज, फोर्जरी, अतिक्रमण, इल्लीगल इलेक्ट्रीसीटी, पायरेटेड सॉफ्टवेअर्स, दहा मिनिटात याला एवढं सापडलं, एका तासात बघा तुम्हाला काय काय सापडेल! एका मुलाचा खून शोधताना कदाचित आणखी काहीतरी महत्वाचं लागेल ना हाताला!

इन्स्पेक्टरः मला नाय वाटतं लागेल.

बनेशः जाऊन ठरवा ना. शोधायला मदत न करणारा माणूस लपवणारा ही असू शकतो.

इन्स्पेक्टरः तू जन्मापासनंच सरकीट आहे का रे?

बनेशः (टेबलवर झुकत) सर, पोलिसांना हुशारी आणि प्रामाणिकपणा दोन्ही एकत्र सिध्द करायची संधी सारखी मिळत नाही. तुम्हाला मिळालीये तर घालवू नका. आय रेस्ट माय केस.

समोरच्या सगळया पेन्सिली उचलतो. इन्स्पेक्टर त्याच्याकडे पहात रहातो.

बनेशः आणि पेन्सिल नका घालू कानात. आत पेन्सिलीच मार्कींग दिसतंय आख्खं!

CUT TO...

## 26: INT/ EVENING/ HOME

आजोबा हातात झाऱ्या घेऊन उभे आहेत. त्यांच्या समोर अबोली, भुभू आणि बनेश आणि अंबादास उभे आहेत.

आजोबाः आज वाचलात तुम्ही पण जीवाला जपा बरका. आणि मंडईत रामायण झालं हे कळालं पण रामाची सीता कोण ते नाही कळलं? म्हणजे तो मुलगा कुठाय ज्याच्यासाठी हे सगळं चाललंय?

बनेशः याच्यात. (पेन ड्राईव्ह बाहेर काढतो.) मिलन डिजीटलच्या दोन्ही पीसीजचे सगळे फोटो आहेत यात.

(तिघं अवाक होऊन पहातात. फ्लॅश जातो. बनेश खाली वाकलेला ते कळतं.)

अबोलीः डुकऱ्या, मग इन्स्पेक्टरला का नाही सांगितलं?

बनेशः समजा तो इन्स्पेक्टर किंवा त्यांच्यातल्या एखादा त्या मुलाला मिळालेले असतील तर? त्यांनी उदया हा डेटा गायब केला तर? व्हेन इन डाऊट, नेवर शाउट!

लॅपटॉपला पेन ड्राईव्ह लावला जातो.

फोल्डर्स उघडली जातात. बनेश एन्टर मारतो आणि मागे वळतो.

समोरच्या खुर्चीत अंबादास बसलेला दिसतो.

बनेशः रिव्हर्स किंग! ओळखा!

फोटोज सरकतात.

अंबादासः  अंबादासला हा मुलगा वाटत नाहीये.

अंबादासः  अंबादासला हा मुलगाच वाटत नाहीये

आजोबा हसतात.

भुभू: (खुर्ची उलटी करुन त्याला पाठमोरा बसवतो.) आता बघा बरं, रिवर्स मदी!

एक एक करुन फोटो पुढे सरकतात. तिसऱ्या फोटोला अंबादास थबकतो.

अंबादासः अंबादासला गॅरंटी आहे, हाच आहे! तो पोरगा हाच आहे!

बनेश त्याला उठवतो आणि स्वतः बसतो.

कीबोर्डवर टाईप होताना दिसतं. ट्रान्झिशन जातं.

भुभू: काय बघताय?

बनेशः त्याचं खरं नाव! (एन्टर मारतो.)

आजोबाः फोटोवरन नाव कसं सापडेल? हॅय!

बनेशः सापडलं. (सगळे एकदम त्याच्याकडे पहातात.) आर ओ एफ एल. रिझल्ट ऑफ फाऊंड लिंक. मनिषनंच सांगितलं, तो बऱ्याच महिन्यानी अभ्यास करत होता, म्हणजे तो रेग्युलर स्टुंडट नाही. म्हणजे तो परिक्षेला बसलेला जुना स्टुंडट आहे. तो हुशार असेल किंवा ढ. ढ मुलगा इतका सिरीयसली अभ्यास करणार नाही. तीन वर्षांपूर्वी सिलॅबस चेंज झाला, म्हणजे गेल्या तीन वर्षात त्यानं पेपर दिला असला पाहीजे. तीन वर्षातल्या सगळया टॉपर्सची लिस्ट काढली. १४ १५ च्या लिस्ट मध्ये हयाचा फोटो सापडला. परत पेपर दयायला आलेला आणि धनेशला मारणारा अमोल टेकवडे!

मॉनिटर वळवतो. पहिल्यांदा त्या मुलाचा चेहरा दिसतो. भुभू अवाक होतो. अबोली खूश होते. आजोबा हात जोडतात आणि अंबादास टाळया वाजवतो. बनेश हसतो. मुलाचा चेहरा दिसत रहातो. त्यावर बनेशचा 'नाईस टू मीट यू अमोल

टेकवडे' असा व्ही ओ येतो. एका बॅटसमन नं दोन सिक्स मारल्याची कॉमेंट्री ऐकू येते. क्राऊडचा आवाज वाढत जातो.

CUT TO...

27: EXT/ EVENING/ SHOP (2)

क्रिकेट कॉमँट्रीचा आवाज ऐकू येतो. एका जुन्याशा खोलीत शूजचा बॉक्स उघडला जातो. त्यातून नवे कोरे शूज काढले जातात. अप्पा बाकावर बसून शांतपणे स्वतःच्या एका पायाकडे पहातो. नवीन शूज घालतो. दत्ताभाऊच्या हाताच्या बँडेजकडे पहातो. विजय एक्साईट होऊन मॅच पहातोय.

विजयः एक्यान्नव अप्पा एक्यान्नव!

अप्पाः (स्लीव्हस फोल्ड करतो.) पारकरचा फोन आलता, पाच टक्याचे पार्टनर व्हा. होतो म्हणलं. पाच तुम्हाला ठेवा.  (तिघं हसतात.) वीसची ऑफर दिलीये परवा.

विजयः वीस!! भारी की!!

अप्पाः दोन वर्षात पन्नास करायची! आणि खंडेरावला उडवायचा! आज आख्खा प्लॅन ऐकवणारे. इन्वेस्ट पन करायचं. चौदा वर्ष थांबलोय आजच्या मिटींगसाठी! (चष्मा घालतो.)

विजयः सिक्सर! सत्त्याण्णव! अप्पा दोन लागलेत आज सेंच्युरीवर!!

अप्पाः दत्त्या कशाला त्या चिल्ल्या पिल्यांच्या मागं लागला?

दत्ताभाऊः चिल्ले पिल्ले? आपल्या पोराबददल बददल विचारत होते ते!

अप्पाः उगाच शायनिंग मारत असतील. परत नाही येत आता! एय नयन मोंगिया, फाईली कुठायत?

विजयः रेडी करुन ठेवल्यात मनोज न मिलनला!! अप्पा ९९!! हया बॉल ला बसला पाहीजे...(फोन वाजतो. कट करतो.) हयाच्या आयला...

(कॉमेंट्री सुरु होते. वन रन नीडेड फॉर सेंचुरी. हिअर कम्स द बॉलर. ॲण्ड... परत फोन वाजतो विजय वैतागून) हां काय रे मनोज? काय? कधी? आईच्च्या गावात! (पॅनिक) अप्पा मिलनवर पोलिसांनी रेड टाकलीय. सील करुन घ्यून चाललेत सगळं. चौकशीला बोलवलंय. आपल्या तीन्ही फायली आणि डॉक्युमेंटस सगळं तिथंच आहे. (फोनवर) हां बोल! इन्स्पेक्टर शिलवंत? त्या पोरानी सांगितलं? त्यांच्या आयला त्याच्या. आलो थांब!

(मोबाईल चालू होतो. डिसमिस्ड ऑन ९९. द फिल्डर वॉज मच फास्टर द क्राउड इज सायलेंट! पूर्ण शांतता पसरते.)

विजयः बनेश फेने. अठरा एकोणीस चा पोरगा आहे. टिपर म्हणला तोच मागं लागला होता इन्स्पेक्टर शिलवंतच्या.

दत्ताः अप्पा हाच तो पोरगा आहे जो कॉलेजला गेला, मग स्वस्तिक लॉजला पोचला आणि आता मिलन डिजीटल ला आला होता. च्यायला हा का एवढया जवळ येतोय?

अप्पाः आता येतोचे तर अडवायचा कशाला? (खिशात जाड पेन टाकतो.) (वळतो.) बनेश फेणे, त्याला मारुन त्याचा  फोटो पाठवू घरी! ये म्हणाव!  किती जवळ यायचं! ये!

CUT TO...

27A. INTERCUT/ BUNGLOW/ EVENING

बनेशः मित्रा येतोय मी. तू तयार रहा. टॉक्क!

27B. INTERCUT/ RESTAURENT/ EVENING

अप्पा निश्चयाने पहात रहातो.

SPLIT SCREEN

दोन्ही बाजूला दोघे समोरासमोर आहेत. एकमेकांकडे वळतात.

दोघांच्या समोरासमोर चेहऱ्यावरच इंटरवल होतो.

# INETRMISSION

## 28. EXT/ MORNING/ ROAD

रस्त्यावरुन एक बाई चाललेली आहे. तेवढयात दोन जण बाईकवर तिच्या मागे मागे जातात. तिच्या जवळ जाणार तेवढयात जोरात हाक मारली जाते.

भुभूः ऐ, टूटू!!

मुलगा तेवढयात बावचळतो. नाराज होऊन समोर येतो. बनेश आणि भुभू उभे आहेत.

भुभूः काय मालक, किती तोळे? (दोघ समोर येतात.) दादा, हा टूटू! चेन ओढतो. लहानपणी मुंबईत एकदा लोकलची पण ओढली होती. आणि हा टेम्पल रन, देवळाबाहेर हयाचा स्टाफ बसतो!

बनेशः हे नाव आहे? टेम्पल रन आणि टूटू?

भुभूः हां, एकदा चेन गिळली ना चोरीची. बावीस केळी खायला घातली पोलिसांनी. चेन बाहेर, पण कोणी हातच लावेना. तेवापासनं म्हणतात. यांनी लई वेळा खायला घातलंय हां आपल्याला. आत्ता जरा आत होते दोघं.

टूटूः मला कळला तुझा किस्सा. बनसोडे तिखट खायला लय घाबरतो आता. (हसतो.) चांगलं आहे, शिक तुझं भलं होईल. (बनेश कडे पहात) आम्ही मागचं जमतो पूल खेळायला. या कधीतरी. यू का आता? (शंभर रुपये काढतो.) ठेव! म्होटी डेरिमिल्क खा!

(निघून जातो.)

बनेशः हा मित्र आहे तुझा? चेन स्नॅचर आणि भिकाऱ्यांचा बॉस?

भुभूः चांगल्या धंदयात वाईट मानसं,तशी वाईट धंदयातही चांगली माणसं असतात दादा! अन सगळयांनाच बनेश आणि भागवत आजोबा थोडीच भेटणार आहेत?

(फोन वाजतो.)

भुभूः काय, आबोली का?

(बनेश चमकून पहातो.)

भुभूः एल ओ एल. चला.

(त्याच्याकडे पाहून हसतो.)

CUT TO...

29: EXT/ MORNING/ ROAD

आबोली बाल्कनीत उभ्या असलेल्या वडलांना बाय करते आणि निघते.

CUT TO...

## 30: EXT/ DAY/ POLICE STATION

पोलिस स्टेशनच्या एका भागात वेल्डींगचं काम चालू आहे. त्यातून ठिणग्या पडतायत. त्यासमोर बनेश आणि भुभू आणि आबोली येते.

बनेशः मी या अमोल टेकवडेचा पत्ता काढणार आज. मिलन डिजीटलमधनं बाकी काय मिळालंय ते बघू. प्लस इन्स्पेक्टर बरोबर एज्युकेशन बोर्ड मध्ये जायचं आणि धनेशचा पेपर काढायचा. एकदा त्यात चांगले मार्क पडलेत हे कळलं की आपोआप सिध्द होईल, धनेशने आत्महत्या केली नाहीये! ग्रेट. वी हॅव क्रॅक्ड इट! चल!

(तिघे आत जाणार तेवढयात दार उघडतं आणि विजय निकम, दत्ताभाऊ आणि अप्पा बाहेर येतात. दत्ताभाऊ अप्पांना दाखवतो. बनेश पुढे येतो. इकडे अप्पा पुढे येतो. मागे पूर्ण वेल्डींगच्या ठिणग्या पडतायत.)

अप्पाः तू बनेश फेणे का? तू तर लई फास्ट आहे फेणे.

बनेशः मीच. तुम्ही?

विजयः अप्पा. मी विजय निकम आणि हा दत्ता. नावं लक्षात ठेव.

अप्पाः एक गोड बातमी दयू का तुला?

बनेशः गोड चालतं का तुम्हाला??

(सगळे अवाक होतात.)

अप्पाः हा काय डिटेक्टीव्हे का? भविष्य पन सांगतो का? सांग की ! मजा वाटतीये.

बनेशः भेटू ना परत! हळू हळू घ्या मजा.

अप्पाः माहीत नाही परत भेट होईल का नाही!

बनेशः होईल ना, कारण एखादया गोष्टीला मध्ये सोडणं मला जमतंही नाही आणि शोभतंही नाही! येऊ का?

(अप्पाकडे ॲटीटयूडने पहातो आणि आत जातो.)

CUT TO...

# 31. INT/ DAY/ POLICE STATION

बनेश आबोली आणि भुभू प्रश्नार्थक आत जातात. समोर पहातात. इन्स्पेक्टर शांतपणे खिडकीत उभा आहे. तीघे तिथे जातात.

बनेशः काय काय सापडलं? प्लीज दाखवा.

इन्स्पेक्टरः माझ्या तोंडावरनं कळत नाहीये का? ट्रॅफिकला टाकलं आजपासनं. तीन महिन्यात पहिल्यांदा तब्येत ठणठणीत झालती तर हा बाँब पडला.

बनेशः काय?

इन्स्पेक्टरः डेटा शील केला रात्री म्हणले हात लावू नका. निकम ला नुसतं चौकशीला घेतलं तर म्हणले सोडून दया. आज सकाळी आलो तर म्हणले ट्रॅफिकला जा. इनडायरेक्टली वॉर्निंग दिलीये यात पडायचं नाही.

बनेशः बाहेरनं धमक्यांना घाबरलात तुम्ही?

इन्स्पेक्टरः आतनं आलीये! खूप वरनं! (थांबतो.) अकरा वर्ष झाली मी कधीच हुशारी आणि प्रामाणिकपणा एकत्र दाखवायला गेलो नाही, पहिल्यांदा गेलो अन ठासली गेली. पोलिस म्हणून माझा या केसशी संबंध संपला.

बनेशः वाटलं नव्हतं एवढया लवकर घाबराल.

इन्स्पेक्टरः तुझ्याही घरी प्रेग्नंन्ट बायको असलं ना तेव्हा कळलं! जा आता!

(तिघं हताश होऊन पहातात.)

32. INT/ DAY/ POLICE STATION

(तिघं बाहेर येतात अत्यंत कन्फ्यूज्ड आहेत.)

बनेशः हा अप्पा एवढा का वाचवतोय अमोल ला? आधी अमोल साठी मिलन ला माणसं पाठवली आणि आता पोलिसांनाही वरुन मॅनेज केलंय. हा अमोल टेकवडे कोणीतरी फार मोठा असणारे! मी आणि भुभू त्याला शोधायला निघतो. आबोली तू एज्युकेशन बोर्ड मध्ये ओळख काढता येतीय का बघ! (दोघांकडेही पहातो.) तुम्हाला भीती वगैरे वाटत नाहीये ना?

दोघं नकारार्थी माना डोलावतात.

तेवढयात फोन वाजतो. बनेश उचलतो.

आवाजः बनेश फेणे? मी पाणिनी जांभेकर बोलतोय.

बनेशः कोण?

आवाजः मी त्या दिवशी वर्गावरचा सर. तुझी धडपड कळाली आणि मला रहावेना. मला तुला भेटायचंय. मला अमोल टेकवडे बददल सगळं माहीतेय.

बनेशः काय??

बनेश सुन्न होऊन ऐकतो.

आवाजः उदया संध्याकाळी सहा वाजता माळवाडी स्टॉपवरुन १०८ नंबरची बस पकड. त्यात मी बसलेला असीन. तुला सांगतो हया प्रकरणात खरं कोण इन्व्हॉल्व्ह आहे. कारण त्या लोकांकडनं माझ्याही जीवाला धोका आहे.

त्यावरच बसचा हॉर्न ऐकू येतो.

CUT TO...

33. EXT /EVENING/ MALWADI ROAD

संध्याकाळी १०८ नंबरची बस येताना दिसते. बनेश आणि भुभू बस पकडतात. आत शिरतात, काही तुरळक माणसं बसलेली आहेत. दोघे एका सीटवर बसतात. सर उठतात, मागे वळतात आणि यांच्यापाशी येऊन बसतात.

सरः हॅलो!

बनेशः सांगा सर पटकन वेळ नाहीये. कोण कोण आहे याच्यात?

एवढयात लेवल कम्प्लिटचा आवाज येतो. बटण दाबलं जातं. बनेश आणि भुभू वर पहातात तर समोर अप्पा आहे.

अप्पाः फाटली का? तिकीटं?

(बस जोरात जाताना दिसते.)

CUT TO...

34: EXT / Edu board / Evening

आबोली एज्युकेशन बोर्डमध्ये एका माणसाशी बोलतेय.

माणूसः पेपर शीट आले की त्याची कॉपी स्कॅन होते. मार्कांची अदलाबदल बाहेर होते. ऑपरेटर कडे. आत स्ट्राँग रुममध्ये ओरिजीनल पेपर तसाच असतो. पिल्ले नावाचे साहेब आलेत आता. त्यांच्याकडे सगळे कंट्रोल असतात.

(आबोलीचा मेसेज वाजतो. आबोली पहाते. हेल्मेट उचलते.)

आबोलीः मी पळते!

तिथून निघून जाते.

CUT TO...

## 35: EXT / BUS / Evening

हॉर्नचा जोरदार आवाज येतो. आता सगळी माणसं त्यांच्या आजूबाजूला बसलीयेत. अप्पा समोर बसलाय.

अप्पाः दहावीत माझ्या वर्गात एक पोरगा होता पिंटया. मी कॉपी करत होतो, मला म्हणला रुद्रनाथ, सरांना सांगीन. म्हणलं गप. तुझं काम कर. सगळे पेपर कॉपी केली मी तर यानी बरोब्बर शेवटच्या पेपरला सरांना सांगितलं. माझं वर्ष गेलं, शिक्षण सुटलं, घर तुटलं, पळून आलो. पंचवीस वर्ष झाली. त्याच पिंटयाचा हुशार पोरगा गेल्या वर्षी दहावीला बसला. सर्व पेपर देऊ दिले मी. फक्त शेवटच्या पेपरला पाठवले चार जण. सेंटर समोर गाडीत बसवलं बाप आणि पोराला. पण पेपर नाही देऊ दिला. म्हणलं बघ काय असतं, शेवटचा पेपर रहाणं. पोरानी तर एवढा धसका घेतला की ऑक्टोबर ला सेंटरपर्यंत जाऊन परत आला. माझ्याकडं यून रडला, पाया पडला, मग आता केला पास त्याला! (हात टाकत) घाबरला का स्टोरी ऐकून?

(प्रचंड टेन्स्ड वातावरण. बनेश त्याच्याकडे एकटक पहातोय.)

बनेशः करप्ट माणसाची भिती ही फक्त करप्ट माणसाला वाटते. आम्हाला नाही.

अप्पाः (समोर उभा आहे.) काय खोटं बोलतो. तू घाबरला नाही?

बनेशः विचारायला लागतंय म्हणजे बघ.

अप्पाः (फाडकन भुभूच्या कानाखाली लावतो.) आता?

(त्याला आणखीन एक मारतो आणि लाथ घालतो. भुभू कोलमडून पडतो.)

बनेशः  बास ऐ! सोड!

अप्पाः सोडतो ना. जा ना मग बनेश्वरला गपचूप.

बनेशः नाही!

अप्पाः परत कम्प्लेट नाही करायची मी चॉईस दिला नव्हता म्हणून!

बनेशः नाही करणार!

अप्पा त्याला धरतो आणि साणकन मुस्काडात वाजवतो बनेश धक्यातच बसतो.

अप्पाः गाडी थांबव रे. (बस थांबते.) दत्ता, धन्यवाद दया यांना!

(भुभू घाबरुन पहातो. बनेश बसलाय. अप्पा उतरतो. मागून सरही उतरतात. तो खिडकीपाशी येतो. बनेशकडे पहातो.)

अप्पाः (हसून) फेग्गे. तू वेळ पण घालवला आणि जीव पण!

बनेश त्याच्याकडे पहात रहातो. डोळे मिटून घेतो.

CUT TO...

36. EXT / Water Tank / Evening

शहर सोडून खडकवासला धरणाच्या परिसरात दोघांना खाली उतरवलं जातं. एक टाकी उघडली जाते. पाण्याच्या फोर्सचा आवाज येतोय. दत्ताभाऊ त्यांच्याकडे पहातो.

दत्ताभाऊः मिस यू!

दोघांना आत टाकलं जातं. दोघं गटांगळया खात पडतात. झाकण लावलं जातं.

टाकीत पाण्याचा प्रचंड आवाज ऐकू येतो. बनेश आणि भुभू गटांगळया खाताना दिसतात. बनेश कसाबसा हात सोडवतो, भुभूला श्वास घेता येत नाहीये. बनेश फोन काढून टॉर्च लावतो आणि इकडे तिकडे पहातो त्याला बाहेर सुटकेसाठी एकही गोष्ट दिसत नाही, तेवढयात टाकीच्या तळाशी त्याला एक लोखंडी रॉड पडलेला दिसतो. तो दीर्घ श्वास घेतो खाली जातो. रॉड उचलतो आणि वर येऊन झाकण ढकलायचा प्रयत्न करतो. भुभू त्याला जोरजोरात ओरडताना दिसतो. बाहेर लोकं गाडया काढून निघून जातात. बनेश त्या रॉडने झाकण आतून ढकलायचा प्रयत्न करतो पण ते बिलकुल हलत नाही. तो प्रचंड झटापट करतो. भूभूकडे पहातो त्याला आता झेपत नाहीये. बनेश तीन चार प्रयत्नांनतर एक सगळा जीव लावून रॉडने झाकण ढकलणार तेवढयात झाकण उघडलं जातं, आणि अबोली दिसते. ती बनेशला हात देते, आणि भुभूलाही हात देते. दोघांना वर काढलं जातं.

CUT TO...

37. EXT / NIGHT/ NEAR WATER TANK

तिघे त्या टाकीच्या मागच्या बाजूला बसलेले दिसतात. एकमेकांकडे पहातायत. भुभू अक्षरशः थरथर कापतोय. बनेशही सुन्न आहे. भुभू तिच्याकडे पहातो.

भुभूः ताई तू कशी?

आबोलीः बनेशने डेंजर असा मेसेज केला होता बसमध्ये चढल्या चढल्या आणि लोकेशन शेअर केलं होतं. वाचलात तुम्ही.

बनेशः मारायचं नव्हतं. घाबरवायचं होतं फक्त.

भुभूः अहो पण, घाबरायला जिवंत राहीलो असतो का? (बनेश निरुत्तर होतो. भुभू रडवेला होतो) दादा एवढे दिवस मी दाखवलं डेअरिंग. पण हे एवढं डेडली होईल असं वाटलं नव्हतं. सॉरी पण मी तुमच्याबरोबर राहू शकतो पण तुम्ही तर नाही होऊ शकतं. तुम्ही रोज रात्री घोडे विकून झोपता पण मी टरकून असतो. एक वर्ष झालं ताई झोपलो नाही मी नीट. मला वाटलं होतं आजोबांकडे आलो तर झोप तरी मिळलं. नशीबातच नाही, च्यायला. चला. आता त्यांना कळायच्या आत तरी जाऊ!

बनेशः त्यांना सांगायचंय सगळं! मी सांगणारे.

आबोली आणि भुभू पहात रहातात.

CUT TO...

38: INT / HOME/ NIGHT

टेबलवर आजोबा बसलेले आहेत. रिकामे कागद आणि पेन. समोर हे तिघे.

आजोबाः चार पाच ठिकाणी लागलंय, याचा गाल सुजलाय, केस आणि कपडे ओले आहेत आणि ऐन उन्हाळयात तुम्हाला थंडी भरलीये हे कळायला एल ओ एल आणि आर ओ एफएल ची गरज नाहीये. काय पराक्रम केलायत?

भुभूः अप्पाच्या गुंडानी आम्हाला टाकीत टाकलं होतं, ही आली म्हणून वाचलो, नाहीतर गेम ओव्हर होता.

आजोबाः छान! कुणाची कल्पना ही टाकीत पोहायला जायची?

बनेशः माझी! मी घेतो जबाबदारी.

आजोबाः अभिनंदन. उदया सकाळी बॅगा उचला आणि निघा. तुमची धडाडी आता आगाऊपणा झोन मध्ये गेलीये.

बनेशः शोधायचं म्हणल्यावर हे सगळं होणार.

आजोबाः जीव गेल्यावर काय शोधणार? चिंचोके? तुम्ही नॉर्मल मुलं आहात, त्या गोष्टींमधले सुपरहीरो नाही की मारल्या उडया आणि चिकटले भिंतीला. पडल्यावर गुडघे फुटतात, दात तुटतात, टाके पडतात आणि दुखत खूप. आणि याच्यासारख्या मुलाचा पाच सात मिनिटं पाण्याखाली राहीला तर जीवही जातो. आईचा फोन आला होता मला. खूप काळजीत होती. तू फोन उचलले नाहीस म्हणाली. आज माझ्याकडे उत्तर होतं, उदया कदाचित नसेल. उदयापासून या घरात हा विषय नाही. आत्ता वर जायचं, (बनेशकडे पहात) आणि उदया घरी!

CUT TO...

39: INT / HOME/ MID NIGHT

रात्री भुभू शांत झोपलाय. बनेश शेजारनं उठतो. त्याच्या डोक्यावर हात फिरवतो. खिडकीपाशी येतो. खिडकी उघडतो. सगळे फ्लॅशेस येतात. त्याचे डोळे भरलेत.

बनेशः बाबा, तुम्ही आहात ना हो बरोबर? तुमच्यामुळे आणि तुमच्यासाठी करतो मी हे सगळं! (थांबून) खरंतर तुमची आठवण येऊ नये म्हणून पळत असतो इकडून तिकडे, आईला हे नाही सांगता येत. (थांबून) मी जाऊ ना बाबा पुढे यात? आँ?

(डोळे मिटून घेतो. वाऱ्याची झुळूक चेहऱ्यावर येते. मागून आवाज येतो.)

आजोबाः नको जाऊस राजा. तुझे बाबा सांगतायत असं समज. तुला काही झालं तर आईला कोणे आहे? तुम्हाला लहान मुलांना वाटत मोठे पराचा कावळा करता पण अरे तुमच्याशिवाय काळजी करण्यासारखं कोणी नाही आमच्याकडे. आम्ही व्हिलन होतो पण तुम्ही सुखरुप रहाता ना. तेवढं बास आहे. जा तू. तुझी आठवण येत राहील फा. फे. (डोळे पुसून वळतात.)

बनेशः हे नाव, ही ओळख तुम्ही दिलीत मला, आणि तुम्हीच काढून घेताय.

आजोबाः तुझी ओळख तुझ्या जीवापेक्षा मोठी नाही, आणि हे तुला आत्ताच कळलं पाहीजे.

बनेशः मी जीव जपत बसलो तर ओळख कधी पुसून जाईल कळणारही नाही.

आजोबाः तुझ्यासारखी पात्र सारखी सारखी सापडत नाहीत, म्हणून जपावसं वाटतं तुला. (पाठीवर हात ठेवत) त्या टेलिस्कोपने आकाशाकडे पहा थोडा वेळ. शांत वाटेल. येतो.

बनेश एकटा आभाळाकडे पहात बसतो. CUT TO...

39A: INT / HOME/ EARLY MORNING

सकाळी भुभू वळून पहातो. बनेश गेलेला आहे.

CUT TO...

40. EXT / EARLY MORNING / GROUND (2)

बनेश आणि आबोली एका ग्राऊंडवर पळतायत.

आबोलीः बाबांनी काल समजावलं मला रात्री खूप वेळ.

बनेशः काय यात पडू नको म्हणून?

आबोलीः (हसते.) नाही. आपण ज्यासाठी हे सगळं करतो त्याबददल इतरांना काहीच वाटत नसतं म्हणून नाराज झाले होते मी.  पण त्यांनी समजावलं. (थांबून) तुला माहीतेय बन्या, माझ्या बाबांना एक पाय नाहीये. तीन वर्षांपूर्वी लँड माफियांचं प्रकरण बाहेर काढलं त्यांनी आर टी आय मध्ये. तर काही जणांनी मार मार मारलं रात्री रस्त्यात गाठून. आख्खी रात्र रस्त्यात तळमळत होते. त्यांचा पाय गेला. पण ती स्कीम रदद झाली आणि ग्राऊंड वाचलं. म्हणून जेव्हा जेव्हा मला डाऊन वाटतं ना तेव्हा मी इथं येते.

बनेशः हे ते ग्राऊंड आहे?

आबोली मान डोलावते. बिल्डींग्सने घेरलेल्या मोठया ग्राऊंडच्या मधोमध दोघे उभे दिसतात.

आबोलीः इथं मुलं खेळताना पाहीली की त्यांच्या एका पायाच्या असण्यावर अभिमान वाटतो मला. आत्ता कोणाला देणं घेणं असेल माहीत नाही. पण आजपासून वीस पंचवीस वर्षांनी जेव्हा शिकून हुशार झालेले चांगले डॉक्टर्स आपल्यासारख्या पेशंटचा जीव वाचवतील ना तेव्हा आपल्याला किंमत कळेल!

बनेशः (शर्टची चेन लावतो.) मी चाललोय लातूरला, अमोल टेकवडे ला शोधायला!

CUT TO...

MONTAGE 4A: (3)

BG2A. बनेश प्रवास करताना दिसतो.

BG2B. बनेश स्टँडवरनं उतरतो. टीव्हीवर पहातो.

शिक्षणमंत्री टेलिव्हीजनच्या कार्यक्रमात दिसतात.

BG2C. अँकरः अभिनंदन. राष्ट्रीय सर्वेमध्ये महाराष्ट्राचा शिक्षणव्यवस्थ्येचा क्रमांक वरचा लागला आहे.

शिक्षणमंत्रीः हो. विदयार्थ्यांचं हित आधी पाहील्यामुळं हे झालंय. त्यांच्या वाढत्या गरजांनुसार येत्या शैक्षणिक वर्षात आम्ही नव्या २४ इन्स्टीटयूटसना परवानगी दिलेली आहे. फॉरेन युनिवर्सिटी टायअप, अँटी डिप्रेशन हेल्पलाईन आणि ऑन कॅम्पस जॉब्स या फॅसिलीटीज पण लवकरच सुरु होतील!

BG2D. बनेश पहाटे एका मेडिकल कॉलेजजवळ पोचतो.

BG2E. मैदानाच्या मधोमध दोन घरांपाशी येतो. शेजारी एखादं झाड. त्या खाली राख पडलेली.

BG2F. दारात डोकावतो.

CUT TO...

41. INT/ DAY/ LATUR HOME

एका जुन्याश्या घरात समोर एक बाई बसलेली दिसते. जाड भिंगाचा चष्मा लावलाय.

बाईः नाहीये त्यो. काम काये?

बनेशः आमचा कॅम्प होता डॉक्टरांचा. धनेश नावाच्या माझ्या मित्रानं सांगितलं जाऊन भेटायला. मोबाईल नंबर आहे का?

बाईः मला नाही येत.

बनेशः हं. (पाणी ठेवायला आत जातो. बाहेर येतो.) कुठे तुळजापूरला गेलाय का तो?

बाई चरकून पहाते.

बनेशः देवघर आख्खं जुनं आहे देवीचा टाक तेवढा नवीन आहे. काय पैसे पाठवले का त्यानी? नाही कारण ज्यातनं पाठवले त्या एन्व्हलपचे तुकडे बाहेर चुलीच्या राखेत आहेत.

बाईः त्याचा मित्र आहे, तिथल्या सरकारी मेडिकल हॉस्टेलला त्याच्याकडं रहातोय. नितीन देशमुख. (रडवेली होते) माझा पोरगा लई चांगला आहे, हुशार आहे हो, पन आता शेतात पानी, खायला अन्न अन खिशात दमडा नाही तर मानूस स्वतःवरच चिडनार ना!

बनेशः त्यानी मारलंय एका मुलाला. आणि आलाच फोन परत तर त्याला सांगा तो वाचणार नाहीये.

(ताडकन तिथून उठतो आणि बाहेर जातो. बाई घाबरुन पहात रहाते.)

CUT TO...

## 42. EXT/ DAY/ BARRAN LAND

एका माळरानावर अप्पा फोनवर बोलत पुढे येतो. खोदकाम चालू आहे. खंडेराव पारकर आणि जांभेकर आहेत.

अप्पाः (फोनवर आहे.) तुळजापूर पर्यंत पोचला? शाब्बास! दत्ताला पाठवतो मी. आज धरा त्याला तिथंच. अन संपवून टाका एकदाच काय तो. लई जीव काढला या एका पोरानी! (फोन ठेवतो.) (सरांना) जाऊन जाऊन जाणार कुठं?? (पहात रहातो.)

अप्पाः तुम्ही इकडं कशे काय?

सरः अप्पा, अहो तुम्हीच बोलवलं पैसे दयायला.

अप्पाः दया की मग! (सगळे हसतात.)! किती म्हणला तुम्ही?

सरः चार म्हणलं होतं.

अप्पाः हं. चार आणा रे भावडयांनो.

(चार छोटी पोती आणली जातात. सरांसमोरुन खडडयापर्यंत नेली जातात.)

अप्पाः (खंडेरावला) बरंका, एक एजंट होता, एक काम केलं, पण पैशे मागायला फोन वर फोन. मला म्हणला उदया चार नाही दिले तर बघ. म्हणलं एकदम चार? तर म्हणला चार तुकडयात दया. (थांबून) मग केले चार तुकडे!

(समोर चार पोती दिसतात. सरांना धडकी भरते.)

अप्पाः (समोरच्यांना) टाका आत! आता कळलं त्याला एखादया गोष्टीला खतपाणी घालनं म्हणजे काय असतं ते! (सरांना) तुम्हाला किती पाहीजेत म्हणला होतात? (सर घाबरुन गाडीत बसतो निघून जातो.)

(खंडेराव आणि पारकर पहात रहातात.)

अप्पाः असं धन्यवाद दयायला लागतं! तुम्ही किती परसेंट म्हणले?

पारकरः सगळं बघणार असाल तर वीस परसेंट करु.

अप्पाः माझ्याकडं दुसरं प्रपोझल आहे. एकशे पन्नास ॲडमिशन. प्लस सहा सीआर. तीस टक्के.

पारकरः डन! आम्हाला वाटलं तुम्ही अजून मागाल!

अप्पाः साहेब, स्वतःची किंमत माहीत नसणारी लोकं एकतर आगाऊ निघतात नाहीतर घाबरट! आपल्याला ती चांगलीच माहीतेय. इथं डे नाईट माणसं लावा, रिझल्ट लागायच्या आत बांधून घ्या. आंबे अन ॲडमिशन यांचा सिझन चांगला गेला की वर्ष निघालं.

खंडेरावः अप्पा, त्या पोत्यात काये हो?

अप्पाः (हसत) गांडूळ खते! (थांबून) असं वाटतं तुम्हाला? (पुन्हा हसतो.) इकडं काय काय होणारे?

(तिघं मोकळया जागेवर दिसतात. समोर एक कन्स्ट्रक्शन झालंय आणि एक चालू आहे.)

खंडेरावः इथं कॉलेज क्लासेस, इथं कॅण्टीन होईल, इथं आपलं हॉस्टेल होणार पाच मजली...

अप्पा त्याच्याकडे पहात रहातो.

अप्पाः उदघाटन जंगी करायचं!

CUT TO...

## 43. INT/ NIGHT/ TULJAPUR HOSPITAL

तुळजापूरमधलं रात्रीचं हॉस्टेलचं टॉयलेट दिसतं. अमोल त्याच्या कम्पार्टमेंट मधून बाहेर येतो. बेसिन समोर तोंड धुतो. शेजारी बनेश चेहरा पुसतो. त्याच्याकडे बघून हसतो.

बनेशः झालं लपून? अमोल टेकवडे?

अमोलः तू कोणे? तुला कुणी पाठवलंय?

(बनेश त्याची गचांडी धरतो. तो झपकन हात सोडवतो आणि कडी उघडून पळत सुटतो. बनेश त्याच्या मागे पळतोय. दोघे कँटीनच्या दाराशी जातात तेवढयात धाडकन दार उघडतं आणि बनेश कोलमडून पडतो. रिकाम्या कँटीनमध्ये समोर अमोल उभा आहे आणि त्याच्या बरोबर मागे दत्ताभाऊ आणि आणखी चार पाच जण. दत्ताभाऊ अमोलच्या जवळ जातात आणि साटकन त्याच्यावर वार करतात. तो कळवळून बनेशच्या पुढयात पडतो. बनेश चक्रावून त्याच्याकडे पहातो)

बनेशः हे तुला का मारतायत?

दत्ताभाऊः कारण आम्ही त्याला वाचवायला नाही मारायला आलोय.

मुलगाः (बनेशकडे पहात) मला वाचव. प्लीज.

(बनेश थक्क होतो. दत्ताभाऊ अमोलचे त्याचे केस धरुन त्याला उठवतात. अमोल जोरात झटका देत पळत सुटतो. बनेशही उठतो आणि दत्ता भाऊ त्याच्या मागे पळत सुटतो)

दत्ताभाऊः नित्या सुम्या पलिकडनं जा, तुम्ही दोघं खाली थांबा. तू चल माझ्याबरोबर.

(छोटी कटर्स काढतात आणि त्या दोघांच्या मागे जातात. बनेश अमोलला मागे घेतो आणि दोघं एका आडोशाला येतात. समोरुन दत्ताभाऊ येताना दिसतात. दोघं पळत एका रुममध्ये जातात. दार बंद करणार तेवढयात धाडकन उघडून दत्ताभाऊ समोर येतात. बनेश कटर  काढणार एवढयात त्याला धरुन दणके देतात तो खाली कोसळतो. ते अमोलला धरतात आणि फरफटत कोपऱ्यात नेतात. त्याचं तोंड दाबतात. बनेश कडे पहातात आणि त्याला आता मारणार एवढयात बनेश उठतो आणि सगळी शक्ती एकवटून शेजारचं स्ट्रेचर जोरात त्यांच्या दिशेनी ढकलतो. अमोल हिसका देऊन बाजूला होतो. दत्ताभाऊंना स्ट्रेचर धाडकन बसतो आणि ते वीस पायऱ्या खाली कोसळतात.

जोरात आवाज होतो. दत्ताभाऊ स्ट्रेचर खाली पडलेले दिसतात. बाकीची सगळी धडाधड त्या दिशेनी धावतात. बनेश आणि अमोल आतल्या बाजूने पाईपवरुन उतरतात उडया मारत खाली येतात.

गेटमधून एक अँम्ब्युलन्स बाहेर निघताना दिसते.

CUT TO...

44. INT /   NIGHT/ AMBULENCE

बनेश आणि अमोल समोरासमोर बसलेत. दोघांनाही लागलंय. बनेश त्याच्याकडे सुन्न होऊन पहातोय.

बनेशः हे तुला मारायला आले होते? का? तू तर मारलंस ना धनेशला.

अमोलः मी नाही मारलं. मी पाहीलं.

बनेशः काय? म्हणजे?

अमोलः हो. (थांबून) मी पैशाची गरज म्हणून दुसऱ्याच्या नावावर पेपर दयायला आलो होतो. मी लेक्चर सिरीजमध्ये गेस्ट लेक्चर घ्यायचो. तेव्हापासनं यांचे एजंट मला गाठायला लागले.

CUT TO...

FLASHBACK

44A. INT /  DAY/ LECTURE HALL

अमोल लेक्चर सिरीजला मुलांशी बोलताना दिसतो.

तिथे एका कोपऱ्यात धनेश बसलेला दिसतो.

बाहेर एक एजंट त्याला भेटतो. अमोल त्याला नाही म्हणतो.

CUT TO...

44B. INT /  DAY/ LATUR AMOL HOME

अमोल ला मेसेज येतो. एक पेपर दया. एक लाख मिळवा.

अमोलची घरात भांडणं चालू दिसतात.  अमोल  रिप्लाय करतो. ओ के.

CUT TO...

44C. EXT / DAY/ SWARGATE

अमोल पुण्यात उतरलेला दिसतो.

CUT TO...

44D. EXT / DAY/ SWASTIK LODGE

अमोल स्वस्तिक लॉजला उतरतो.

CUT TO...

44E. EXT / DAY/ MILAN DIGITAL

अमोलचा फोटो काढला जातो. तिथे विजय निकम आणि दत्ताभाऊ दिसतात.

CUT TO...

44F. INT / DAY/ CLASSROOM

अमोल पेपर दयायला आत जातो तेवढयात बनेश धनेशला ढकलतो, तो अमोल ला जाऊन धडकतो. धनेश त्याला पहातो. अमोल चेहरा लपवून जातो. धनेश सरांकडे जाऊन कम्प्लेंट करतो. सर दत्ताभाऊंना मेसेज करतात. धनेश बाहेर पडतो. पाठोपाठ अमोल.

CUT TO...

44G. EXT /  DAY/ COLLEGE CORRIDOR

कॉरीडॉरच्या कॉर्नरला धनेशला दत्ताभाऊ धरतात आणि स्टोअर रुममध्ये नेतात. अमोल ला निघायला सांगतात. अमोल आडोशाला थांबून रहातो.

धनेश आणि दत्ताभाऊची बाचाबाची होते. धनेश बाहेर जायची झटापट करतो. त्याचं तोंड दाबलं जातं. अप्पा समोर येतात. फोनवर बोलून बंद करतात. दोघं तिघं त्याला धरतात आणि दत्ताभाऊ त्याला सरकन ब्लेड लावतो. अप्पा अमोल ला पहातो. अमोल घाबरुन पळून सुटतो.

CUT TO...

44. INT /   NIGHT/ AMBULANCE

अमोल भेदरलेला आहे आणि बनेश आश्चर्यचकीत.

बनेशः अप्पानी मारलं त्याला? तुझ्यासारखं एका मुलाचं प्रकरण बाहेर यील म्हणून?

अमोलः एकाचं नाही, त्या सेंटरवर पंधरा जण होते. पुण्यात शंभर सौव्वाशे असतील. राज्यातनं चार पाचशे तरी बोगस टाईप डॉक्टर होतात दरवर्षी. पाच ते दहा लाख रेट. अन प्रायवेट ला चाळीस ते ऐंशी.

बनेशः (शॉक्ड आहे. सगळं ऐकून घेतो. त्याच्याकडे पहातो.) फुकट अभ्यास करतात लाखो मुलं यार आणि हे असे आरामात कोणालाही डिग्र्या मिळवून देतात. (उठतो.) म्हणजे तू अशा कुणाच्या तरी नावावर परिक्षेला बसला होतास, ज्याचं नाव बाहेर येऊ नये म्हणून अप्पानी कोणाच्यातरी सांगण्यावरुन धनेशला मारलं, अप्पा आणि गँगला कोणाचं नाव बाहेर येऊ दयायचं नाहीये? इतका मोठा कोण आहे? ज्याच्यासाठी हे आख्ख रॅकेट चालवलं गेलं? (वळून) कोणाच्या नावावर बसला होतास परिक्षेला?

अमोलः राहुल खामकर म्हणून होता!

बनेशः राहुल खामकर?

(फेसबुक दिसतं त्यावर सर्च मारला जातो. राहुल खामकर. दहा ऑप्शन्स येतात.)

CUT TO...

45. EXT-INT /  DAWN/ AAJOBA HOME

आजोबा पायऱ्यांवर उभे आहेत. शेजारी भुभू आणि अमोल बनेश आणि आबोली.

बनेशः हाच तो मुलगा, याला शोधायचं होतं. आधी लातूर ला गेलो मग तुळजापूरला.

अमोलः काल यानी मला मरता मरता वाचवलंय.

भुभू त्याच्याकडे पहातो. आबोलीकडे पहातो.

बनेशः महत्वाचं हे आहे की आता कळलंय की हा एक खून नाही तर करोडो रुपयांचा स्कॅम आहे ज्यातनं एका मुलाला वाचवायचंय. आणि मी परत आलो कारण मला फक्त एवढचं सांगायचं होतं की हे सोडवताना कदाचित माझा जीव जाईल, पण नाही सोडवलं तर मला कधीच नीट जगता येणार नाही.

आजोबाः धोका वाढणारे. तयारी आहे?

बनेशः मी मला सांभाळेन तुम्ही याला सांभाळा. या आख्ख्या प्रकरणाचा हा एकमेव साक्षीदार आहे. याला इथं लपवून ठेवायचंय.

आजोबाः कपाटात चालेल? (हसतात. अमोलला) काळजी करु नकोस, तू सुखरुप असायची जबाबदारी माझी. जा तू आराम कर! आम्ही आहोत!

(तो वर जातो.)

भुभूः सॉरी दादा. लई झाडला तुम्हाला उगाच.

बनेशः नो स्ट्रेस! या राहुल खामकर ला बाहेर काढतो आधी.

आबोलीः सापडला?

बनेशः नाही अजून. एफबीवर दहा जण होते. त्यातले सहा पुण्यातले होते. त्यातले चार पंचवीस च्या आतले होते आणि त्यातले दोन बारावी झालेले. त्या दोघांना भेटतो.

आजोबाः धन्य आहे. एक उपदव्यापी कुमार डिटेक्टीव्ह, एक माजी बालगुन्हेगार आणि एक आगाऊ पत्रकार तीघं मिळून माझ्या घरात बसून २०० कोटीचा स्कॅम सोडवतायत. आणि मी तो पहातोय.

आबोलीः एकमेव साक्षीदार सापडलाय. आज पेपरचे मार्क्स काढते तू राहुल खामकर शोध आणि उदया आपण सगळं बाहेर काढू! ग्रेट! चला मी आलेच! (वळते.) बन्या, सगळं संपल्यावर एक कॉफी डयू आहे हां आपली!

बनेशः येस्स!

(दोघे एकमेकांकडे हसून पहातात.)

CUT TO...

46. INT/ DAY/ EDUCATION BOARD

आबोली एका सेक्शनमध्ये येते. तिथे एक ऑपरेटर बसला आहे. आबोली कॉन्फीडन्टली त्याच्या जवळ जाते.

आबोलीः एक्सक्युज मी मला मारण्यांनी पाठवलं होतं.

ऑपरेटरः येस.

आबोलीः मला पिल्ले साहेबांकडे घेऊन चला.

ऑपरेटरः का?

आबोलीः त्यांना सांगायचंय की एका मुलाचे मार्क बदलण्याचा प्लॅन चाललाय. कारण त्याचे खरे मार्क्स बाहेर आले की कळेल सगळयांना त्यानं आत्महत्या केली नाहीये.

ऑपरेटरः अच्छा? असा मुलगा आहे?

आबोलीः धनेश लांजेकर नाव आहे. २३२३२९० नंबर.

ऑपरेटरः इथं मी असताना कोणालाही मी मार्क्स बदलू देणार नाही. थांब. (नंबर काढतो.) हा मुलगा तर  फेल आहे. दोनशे पैकी सत्तर.

आबोलीः इम्पॉसिबल. मला पिल्लेंकडे घेऊन चला प्लीज.

ऑपरेटरः कसं नेणार ते तर तुझ्या समोर बसलेत. मीच पिल्ले. मीच सांगीतलं होतं मारणेला परत आली तर डायरेक्ट माझ्याकडे पाठव. बस! बस!

CUT TO...

47. EXT/ DAY/ RAHUL KHAMKAR HOME

(बनेश घराची बेल वाजवतो. एक बाई उघडते.)

बनेशः राहुल आहे?

बाई हाक मारते. राहुल दादा.

बनेश आत डोकावून पहातो. शोकेसमध्ये काही गोष्टी दिसतात. बनेश नमस्कार करतो, एवढयात फोन वाजतो.

बनेश फोन उचलतो.

बनेशः हॅलो!

अप्पाः आला का तुळजापूरहून?

बनेशः (एक क्षण चमकतो.) मी आत्ता माझ्या माझ्या कामात आहे.

अप्पाः फेणे तू फार पुढं आला पळत पळत. आता एक शेवटचा पेपर देच हा. प्रश्न आहे फेणे कोणाला वाचवणार? अे. अबोली. बी. आजोबा. सी. अमोल डी. स्वतःला!

बनेशः काय केलस तू?

अप्पाः यू कॅन गो फास्ट. बट आय कॅन गो एव्हरीवेअर. पळ. मी नाही सांगणार.

(धाडकन फोन कट होतो. बनेश तिथून जोरजोरात पळत सुटतो. राहुल खामकर दारापाशी येऊन पहात रहातो.)

CUT TO...

48: EXT/ EVENING/ TUTU CLUB

बनेश टूटूच्या अडयावर जातो भुभूच्या नावाने ओरडतो. सगळे बाहेर येतात. आणि बनेश सोबत पळत सुटतात.

CUT TO...

49: EXT/ EVENING/ HOME

बनेश घरात शिरतो. पिंजरा तुटून खाली पडलाय. धडाधड सगळया खोल्यांमध्ये पहातो. नासधूस केलेली दिसते. पळत पळत वर जातो. त्यांच्या खोलीचं दार उघडतो, आजोबा मधोमध पडलेले दिसतात. त्यांच्या जवळ जातो. त्यांना जागोजागी लागलेलं दिसतं. सगळे मागे जमा होतात. बनेश अमोलच्या नावाने हाका मारतोय तो कुठेच दिसत नाहीये.

त्यांना खाली आणलं जातं. अँब्युलन्समध्ये टाकतात. बनेश दार बंद करतो. तेवढयात त्याला कपाट दिसतं. तो पळत पळत जाऊन दार उघडतो. त्यातून अमोल टेकवडे खाली पडतो. बनेश त्याला धरतो. धपाधप सगळे सुटतात.

CUT TO...

50. INT/ NIGHT/ HOSPITAL

बनेश फॉर्मवर सहया करतो.

दोन पोलिस तिथून निघून जातात.

डॉक्टर त्याला आत बोलवतात.

आता बनेश भुभू आजोबा आणि डॉक्टर असे चौघं आणि बाहेर पंधरा वीस मुलं थांबलेली.

डॉक्टरः चोवीस तास खूप क्रिटीकल आहेत. बघुयात आपण काय बेस्ट करता येतंय. या वयात शारिरीक पेक्षा, आपल्यावर हल्ला झालाय या मानसिक धक्यानी म्हातारी माणसं खचतात.

बनेशः ही इज अ फायटर.

डॉक्टरः बट ही हॅज टू फाईट!

(तिघं आजोबांकडे पहातात. डॉक्टर पाठीवर हात ठेऊन निघून जातात. बनेश आणि भुभू त्यांच्याकडे पहातात. भुभू त्याच्या जवळ येऊन मिठी मारतो. त्यांची अवस्था पाहून दोघं रडवेले आहेत. तेवढयात फोन वाजतो.)

अप्पाः केलं का ॲडमिट? आता उदया सकाळी अमोल ला गपचूप घ्यून यायचं सांगतो तिथं.

बनेशः मला नाही माहीत तो कुठाय!

अप्पाः घे बरं आई रक्ताची शप्पथ! घे ना! घे! (हसतो.) उदया अमोल जर माझ्याकडं आला नाही तर अबोली जाणार, आजोबा जाणार आणि रिजल्टही जाणार. फेणे मी फिरवणार रिजल्ट यंदाचा. एकशे नव्वद च्या पुढच्या किती जणांच्या आकडयातला एकएक डिजीट उडवून टाकतो बघ. दोन पाच जण तर

डिप्रेशननीच आत्महत्या करतील. तुझ्या धनेश सारखी. बाकीचे येतील माझ्याकडं. विज्या अॅड्रेस पाठवलं तिथं घ्यून ये.

बनेशः मी येणार नाही!

अप्पाः तुझा बाप पण येईल! आणि हा पोलिस बिलीसांना तू आणतो का त्याला आणायला सांगू? (हसतो.) आजची रात्र आहे ठरवायला, एका अनोळखी मुलाला वाचवायचं का दोन जवळच्या माणसांना घालवून, हुशार मुलांच्या आख्ख्या बॅचच नुकसान करायचं! सोडवा. शंभर मार्काचा प्रश्न!

(फोन कट होतो. बनेश मटकन खाली बसतो. शेजारी भुभू.)

बनेशः हे इतकं मोठं असेल याचा अंदाज नाही आला मला. आपल्या शोधासाठी या पैकी एका कुणाचा तरी जीव जाणार याहून मोठा त्रास नाही दुसरा.

भुभूः दादा, आपण मिटवून टाकू बास.

बनेश त्याच्याकडे पहातो. दोघांनी माना खाली घातल्यात. पूर्ण हरलेले आहेत.

एवढयात आजोबांचा हात त्याच्या गुडघ्यावर येतो.

आजोबाः बनेशकुमार, अहो हे तुम्हाला चालेल, आम्हाला कसं चालेल?

बनेशः (चमकून पहातो.) आजोबा?

आजोबाः हा हल्ला तुझ्यामुळे झाला हे मान्य पण त्यातून वाचलोय पण मी तुझ्यामुळेच. फेणे, तू नसतास तर मी म्हाताराच राहीलो असतो. तू नसतास तर अमोल ला कपाटात बंद करायचं बळ आणि हुशारी नसती आली. तू तुझ्यासारखं केलंयस मला. आता तूच ते विसरु नकोस. मागे फिरणं सोप्प आहे, पण पुढे जाणं गरजेच आहे. तू हारलास तर मला वाईट वाटणार नाही, पण मधून सोडून गेलास तर कदाचित सगळी जमवलेली उमेद हरवून बसेन. (एकमेकांकडे

पहातात.) या आख्ख्या प्रकरणात अशी एकही गोष्ट नाही ज्यानी तुम्ही त्यांना हरवू शकता. सरस्वती देवींची लाज राखा म्हणजे झालं!

बनेश त्यांच्याकडे पहात रहातो. समोर त्या मूर्तीकडे पहात रहातो. अनाहूतपणे नमस्कार करतो. पुन्हा आजोबांकडे पहातो. एवढयात बनेशचा मेसेज वाजतो.

उदया सकाळी दहा वाजता.  पाषाणचा हणमंतराव भोसले भुयारी मार्ग.
विजय निकम.

म्युझिक वाढत जातं.

CUT TO...

51. EXT/ MORNING/ TEMPLE

अप्पा कडकडीत कपडयांमध्ये देवळात येताना दिसतो.

नवीन बूट काढतो.

काऊंटरला देतो.

शंकराला नमस्कार करतो.

त्याला गंध लावलं जातं.

काऊंटरवरुन बूट घेतो आणि निघतो.

CUT TO...

52. EXT/ MORNING/ TUNNEL

एका अंडर कन्स्ट्रक्शन टनेलमध्ये बनेश आणि भुभू अमोलला घेऊन येताना दिसतात. समोर विजय निकम आणि आणखी दोन जण.

विजयः ऑक्शन असल्यासारखं वाटतंय राव!

त्याला विजय निकमच्या तावडीत दिलं जातं.

विजय आबोलीला आणायला सांगतो. तिला सोडलं जातं. ती येऊन बनेशला मिठी मारते. बनेश खिन्नपणे पहात हसतो.

अमोल झटापट करतोय. माणसं धरुन ठेवतात. हे तिघं निघणार तेवढयात

विजय निकमः ऐ फेणे अप्पानी एक निरोप दिलाय तुला! रिझल्ट फिरणारे! तुझ्या एका हटटापायी हजारो पोरांचं करीअर बरबाद करणार तू फेणे! (हसून) याला म्हणतात शेवटच्या बॉलवर सिक्स! चले.

त्यांच्यासमोर अमोलचे हात पाय बांधले जातात. तो झटापट करतोय. त्याला तोंडावर टेप लावली जाते. त्याला पोत्यात टाकतात.

बनेश आबोली आणि भुभू रडेवेले होऊन पहातायत.

बनेशः चला, आपलं काम संपलं.

CUT TO...

53. EXT/ DAY/ COLLEGE INNAGURATION

ताशाचा आवाज वाढत जातो. मिरवणुक चाललेली दिसते. इन्स्टीटयूटचा बोर्ड दिसतो. अप्पा खंडेराव पारकर आणि शेवटी शिक्षणमंत्री असे सगळे उदघाटन करतात. मागे विक्रमी संख्येत स्टुडंट उभे आहेत. अप्पा या सगळयात करारीपणे इकडे तिकडे पहातोय.

CUT TO...

54. INT/ DAY/ GODOWN

पोत्यातून बाहेर काढलेल्या अमोलला हातपाय बांधून डोक्यावर फडकं टाकून बसवलंय. तो झटापट करतोय. निकम हातात चॉपर घेतो. त्याच्या जवळ जवळ जातो.

CUT TO...

## 55. INT/ DAY/ COLLEGE HALL

मोठठया हॉलमध्ये समारंभ आणि पत्रकार परिषद चालू आहे. शहरातले मान्यवर आणि पत्रकारही बसलेले आहेत. शिक्षणमंत्री भाषणाला उभे आहेत.

शिक्षणमंत्रीः आज बाहेर हजारो विदयार्थ्यांची ही गर्दी पाहून मला गहिवरुन आलं आहे. ही सगळी हुशार मुलं आहेत. स्वतःच्या कर्तृत्वावर शिक्षण घेणारी.

(बाहेर मुलं लाऊडस्पीकरवर ऐकतायत आणि प्रोजेक्टरवर पहातायत.)

हुशार विदयार्थ्यांना समान संधी या तत्वावरच ही इन्स्टिटयूट मोहन खंडेराव, आतिश पारकर आणि शैक्षणिक कार्यकर्ते अप्पा अंधारे यांनी स्थापन केलीये. त्यांची व्हिजन हीच या कामाची प्रेरणा आहे.

(अप्पाचा फोन वाजतो. अप्पा कट करतो. पुन्हा वाजतो. अप्पा उठून बाजूला जातो.)

शिक्षणमंत्रीः हुशार आणि प्रामाणिक विदयार्थ्यांच्या त्यागावरच ही संस्था भरभराटीला येईल याचा मला विश्वास वाटतो.

अप्पाः काय रे विज्या?

विजयः अप्पा गेम पडली. हा तर राहुल खामकर आहे. अमोल टेकवडे नाही.

अप्पाः काय?? सोड त्याला!!

(तिथून ताडकन उठतो. बाजूला येतो. विचारात पडतो. एवढयात त्याचा फोन वाजतो.)

अप्पाः हॅलो!

बनेशः मस्त दिसतंय जॅकेट! एवढं टेंशन का आलंय पण?

अप्पाः अमोल टेकवडे कुठाय?

बनेशः तुला काय वाटलं? फक्त तूच डमी बसवू शकतोस? आम्ही नाही!

अप्पाः वाटटेल ते बोलू नको. अमोल कसा गायब झाला तिथनं?

बनेशः गायब कसा झाला माहीत नाही प्रकट कसा होईल मी सांगतो.

मंत्र्यांचं भाषण संपतं. सगळे टाळया वाजवतात.

खंडेरावः प्रत्येक एज्युकेशनल इन्स्टीटयूटच्या उभारणीमागे एक कथा असते. आमच्या मागे काय आहे हे पाहूया. ए व्ही प्लीज!

55A. INT/ DAY/ AV ROOM

(एव्हीच्या मशीनवर भुभू बसलेला दिसतो. तो येस म्हणून स्माईल करतो.)

(अंधार होतो. एव्ही सुरु होते. सगळे पहातायत. अचानक राहुल खामकर बसलेला दिसतो.)

राहुल खामकरः माझं नाव राहुल खामकर आहे. सॉरी पप्पा मला हे असं सांगायचं नव्हतं. (थांबून) मी एज्युकेशन मिनिस्टर मनोहर कोलतेंचा मुलगा आहे. (मान खाली घालतो.) दुसऱ्या बायकोचा मुलगा. (मिनीस्टर खाटकन तिथे पहातात. त्यांची सावली एव्हीवर मधोमध आणि शेजारी राहुल खामकर. प्रेक्षकात कुजबूज सुरु होते.) माझा ॲक्सीडेंट झाला होता बाईकवर लोनावळयाला.मला डॉक्टर व्हायचं होतं पण एक्साम देता येणार नव्हती. मग माझ्या वडलांच्या पी एंच्या सांगण्यावरनं अप्पा अंधारे यांनी अमोल टेकवडे या मुलाला परिक्षेला बसवलं.

(मंत्री प्रचंड रागाने खंडेराव आणि पारकर कडे पहातात.)

(अमोल टेकवडे दिसतो. बाहेर मुलं थक्क होऊन पहातायत.)

(वातावरणात कमालीची अस्वस्थता तयार होते. सगळया पत्रकारांच्या मोबाइलवर मेसेज येतात. सगळे ते पहातायत.

अमोलः मी अमोल टेकवडे, ज्यानं याच्या नावानं लातूर वरुन येऊन पेपर दिला. देताना धनेश लांजेकरनं मला ओळखलं म्हणून अप्पा अंधारे यांनी स्वतःच्या हातानी येऊन त्याचा खून केला. तसं करण्यासाठी बीबी म्हणजे शिक्षणमंत्र्याचे पी ए भानुप्रसाद बोरसे यांच्या ऑर्डर्स होत्या. (थांबून) आम्हाला सगळयांना शिक्षा झाली पाहीजे.

(मंत्री आणि पी ए निघतात त्यांना पत्रकार अक्षरशः घेराव घालतात. खंडेराव आणि पारकर डोक्याला हात लावून बसतात. सगळे अप्पांकडे पहातायत. अप्पा तिथून पळत सुटतो. बनेश त्याच्या मागे जातो.)

CUT TO...

## 56. EXT/ AFTERN/ STAIRS & TERRECE

अप्पा पळत पळत जिने चढत चढत कॉलेजच्या गच्चीवर येतो. बनेश त्याच्या मागे आहे. अप्पा दमलेला आहे बनेश त्याचा समोर तसाच उभा. आता दोघंच समोरासमोर. खाली ही गर्दी जमलेली. दोघं एकमेकांकडे पहातायत.

बनेशः मी तुला चार ऑप्शन देतो अप्पा. एक. उडी मार. कबूल कर. दोन कबूल कर. तीन कबूल कर. चार. कबूल कर.

अप्पाः मी मेलो तरी चालेल तुला मारुन मरत असतो मी. एक केला तिथं दोन करणार आज.

(बनेशच्या अंगावर धावून जातो. बनेशला धरणार एवढयात बनेश त्याच्याच खिशातलं पेन काढतो. वळतो आणि त्याचा मानेत खुपसतो. अप्पा ओरडत दोन पावलं मागे होतो.)

अप्पाः (हसत) माझ्याच इंजेक्शननी मारणार तू मला? इन्शुलिनच्या इंजेक्शननी?

(इंजेक्शन काढून त्याच्यावर पाय देऊन ते तोडतो.)

बनेशः त्यात इन्शुलिनच आहे हे कोणी सांगितलं तुला?

अप्पा त्याच्याकडे पहातो. आणि तसाच धाडकन खाली पडतो. बनेश त्याच्याकडे पहातो. त्याच्या जवळ येतो.

बनेशः तुझ्या डोळयात प्रश्न आहेत अप्पा आणि माझ्या हातात उत्तरं. तीन मिनीटात तू बेशुध्द होशील तोवर सांगतो म्हणजे रुखरुख नको रहायला.

(पुन्हा एकदा घडयाळ लावतो.) ऑप्शन एक. राहुल खामकर!

CUT TO...

## 56A. EXT/ AFTERN/ STAIRS & TERRECE

**बनेश व्ही ओः** दोन राहुल खामकर होते. त्यातला एक जरा जास्तच श्रीमंत होता. राहुल ज्योती खामकर. तीन महिन्यापूर्वी सुपर बाईक घेतली होती. आणि त्याचा महिन्याभरापूर्वी ॲक्सीडेंट केला होता. मग दोन पार्टस बदलून त्यानी गाडी विकायला काढली होती. सव्वा सहा ला नवी कोरी मिळणारी बाईक साडे पाचला सेकंड हँड कोण घेईल. मी इंटरेस्ट दाखवला. त्याच्या घरी पोचलो आणि नेमकी तिथे तीच सरस्वतीची मूर्ती दिसली जी शिक्षणमंत्र्याना एज्युकेशन एक्सपो ला मिळाली होती. आजोबांनी हॉस्पिटलमध्ये सरस्वतीचं नाव घेतलं आणि डोक्यात लख्ख प्रकाश पडला. वडलांचं नाव आणि ओळख लपवणारा मुलगा, घरीच असणारी आई, आणि मंत्र्यांना मिळालेली सरस्वतीची मूर्ती या सगळयावरनं कळालं की हा मंत्र्यांच्या मुलगा आहे. काल रात्री बोलवलं त्याला बाईक घेऊन. टेस्ट राईड करायला मागे बसवलं आणि नदीकाठी नेऊन उचलला.

राहुल खामकर चं घर दिसतं.

लेटर बॉक्सवर ज्योती खामकर नाव दिसतं.

खाली बाईक दिसते. ज्याला ॲक्सीडेंट झालेला आहे हे कळतो.

राहुलच्या दारावर येतो. दार उघडतं सरस्वतीच्या मूर्तीकडे बघून नमस्कार करतो. अप्पाचा फोन वाजतो. बनेश पळतो.

आजोबा हॉस्पिटलमध्ये सरस्वतीच्या मूर्तीचं वाक्य म्हणतात. बनेशचे डोळे चमकतात.

CUT TO...

56B. EXT/ NIGHT/ NADI ROAD

बनेश राहुल खामकरला फोन करतो.

रात्री राहुल खामकर गाडी घेऊन येतो.

बनेश गाडी चालवत चालवत नदीच्या किनारी घेऊन येतो जिथे भुभूची पोरं त्याला उचलतात.

CUT TO...

56. EXT/ DAY/ COLLEGE TERRECE

(अप्पाच्या डोळयात राग दिसतोय)

बनेशः अमोलचा जीव धोक्यात घालायलाच लागणार होता नाहीतर काहीच उपयोग झाला नसता. अमोल ला मागे पोत्यात टाकलं, तेव्हाच पुढनं अंबादास नं आयुष्यातला सगळयात डेडली रिव्हर्स घेतला आणि गाडी धडकवली. सगळयांचं लक्ष पुढे होतं. तेवढयात मागनं अमोलला बाहेर काढलं आणि राहुलला आत टाकलं. विजय निकम, ऑफस्टंप झाकायला गेला आणि मागनं दांडी उडाली.

CUT TO...

56C. EXT/ DAY/ ROAD

विजय निकम आणि माणसं अमोलला पोत्यात टाकून गाडीत बसतात. पुढे जाणार एवढयात अंबादास जोरात रिव्हर्स घेतो. आणि धाडकन गाडी धडकते. मागचं दार उघडलं जातं. पुढे सगळे हबकतात. दोन जण उतरतात. विजय काच खाली घेतो. ओरडाआरडा करतो.

अंबादासः (गाडीत टूटूला) आयुष्यात पहिल्यांदा रिवर्सला धडकलो राव!

विजयचे दोन जण येऊन अंबादासला धरायला जातात. तो तसाच गाडी पुढे घेतो. गाडी जोरात निघून जाते. हे दोघे परत गाडीपाशी येतात.

विजय काच वर घेतो. मागे पहातो. पोतं तसंच आहे.

CUT TO...

## 56. EXT/ DAY/ COLLEGE TERRECE

बनेशः राहता राहीला प्रश्न तुझा! शंकराचे भक्त, विदयार्थ्यांचे छत्र, डायबेटीस ने ग्रस्त, सतत नवीन बूट घालणारे गृहस्थ अप्पा अंधारे! आज सकाळी शंकराच्या मंदीरात आमच्या टूटू नी तुझं इन्शुलिनचं पेन बदललं. पोलिस स्टेशनमध्येच कळलं होतं मला रोज इन्शुलिनचं इंजेक्शन घेणारा आहेस तू ते. शर्टावर पोटापाशी रक्ताचे डाग होते. आणि तुझ्या अडडयाचा अ‍ॅड्रेस तू स्वतःहून दिलास पोरांना. काऊंटरवरच्या पोराने नवीन बूट दिले ते स्वतःचे आहे का नाही, न बघताच घातलेस. तुझ्या बुटाला ट्रॅकर लावला होता. बाराशेला मिळतो.

56D. EXT/ MORNING/ TEMPLE

अप्पा मंदीरात जाताना दिसतो.

अप्पा शूज काऊंटर वर ठेवतो.

आत जातो. टूटू त्याच्या खिशातून पेन काढून बदलतो.

अप्पा बाहेर येतो. काऊंटरवरचे दुसरेच नवीन शूज उचलतो.

चालत बाहेर जातो.

बनेश लॅपटॉपवर बसून अप्पाला ट्रॅक करताना दिसतो.

मंथन रेस्टॉरेंट असा अॅड्रेस दिसतो.

CUT TO...

56. EXT/ DAY/ COLLEGE TERRECE

बनेशः वरती रेस्टॉरेंट आणि खाली गोडाऊन! व्वा! आमच्या पोरांनी तुझ्या रेस्टॉरेंटखालच्या अडडयावर जाऊन एकशे सत्तर बुटांचे बॉक्स काढलेत. पण गम्मत म्हणजे त्यात बूट नाहीचेत. ते दुसरीकडेच आहेत. (मोबाईल काढतो.) सहा फुट लांबीची आनि सहा फूट रुंदीची नोटांच्या थप्पी त्यांनी आणि इन्स्पेक्टरनेही आयुष्यात कधीच पाहीली नव्हती.

CUT TO...

56F. INT/ DAY/ GODOWN

इन्स्पेक्टरने पोलिसांबरोबर रेड मारलेली दिसते. बॉक्स फाडले जाताना दिसतात. विजय आणि राहुलला धरलं जातं. नोटांच्य थप्प्या दिसतात. त्यात चोर आणि पोलिस एकत्र व्ही करतायत. इन्स्पेक्टरने विजय निकम आणि राहुल खामकर दोघांनाही धरलंय.

CUT TO...

56. EXT/ DAY/ COLLEGE TERRECE

बनेशः आबोलीचं आर्टीकल सगळया प्रेस वाल्यांना ऑलरेडी पाठवलंय. आजोबांनी पोलिस महासंचालकांनाच फोन करुन पिल्ले आणि धुरींबददल सांगितलंय. तू मला एका प्रश्नाचा एक ऑप्शन निवडायला सांगीतला होतास. मी चारही निवडले मी. (त्याच्या जवळ जातो. बसतो. त्याची गचांडी धरतो.) याला म्हणतात नो बॉल वर सिक्स. दहावीच्या परिक्षेला कॉपीच्या ऐवेजी अभ्यास केला असता तर हा धडा शिकायला लागला नसता!

(बनेश घडयाळ थांबवतो. दोन मिनीट एकोणसाठ सेकंद झालेली दिसतात. अप्पा डोळे मिटून पडतो. आता बनेश गच्चीच्या कोपऱ्यावर येऊन पहातो. सूर्यासमोर त्याच्या एकटयाची उभी आकृती दिसते. खाली सगळी मुलं आहेत.)

CUT TO...

MONTAGE 5: (3)

A. न्यूज चॅनल्सवर धडाधड बातम्या यायला लागतात.

B. एज्युकेशन बोर्डमध्ये पोलिस पाठवले जातात. पिल्ले चक्रावून समोर पहातो.

C. मिलन डिजीटलच्या बाहेर पोलिसांची गाडी येते, तिथून लोकांना बाहेर काढलं जातं.

D. सगळी डॉक्युमेंटस समोर दिसतात. आबोलीच्या गालावर पप्पी घेतलेली दिसते. एडीटर तिच्याकडे पहाते आणि तिला मेकअपचा बॉक्स देते.

एडीटरः तो विटनेस कुठाय आता?

E. भुभूच्या जुन्या घराचं दार उघडतं, तिथे आता अमोल टेकवडे बसला आहे. त्याच्या आजूबाजूला भुभूची गँग. सगळयांच्या पायात नवेकोरे शूज दिसतात!

F. रिझल्ट डिक्लीअर होतो.

G. ऑनलाईन रिजल्ट चेक केला जातो.

H. मुलांच्या आनंदी रिॲक्शन्स जातात.

57. INT/ DAY/ DHANESH HOME

धनेशचे वडीलः (रडवेले आहेत) बनेश! अरे, १९९ म्हणले पडलेत त्याला. १९९. पहिला आला म्हणे आमचा धनेश!

बनेशः हो. त्याचा ओरिजीनल पेपर काढून तपासायला लावला स्ट्राँगरुममधून. तुमचा मुलगा डॉक्टर नाही होऊ शकला काका, पण या पुढची सगळी हुशार मुलं मेरीट वर डॉक्टर बनतील ती केवळ धनेशमुळं!

आई वडलांच्या डोळयातून पाणी येतं. मागे त्याचा लहान भाऊ अभ्यास करताना दिसतो. त्याच्या हातात आजोबांचा पेन आहे. त्यानेच तो झपाझप लिहीतो आहे.

CUT TO...

## 58. EXT/ DAY/ HOME

बॅग्स उचलल्या जातात. बनेश आजोबांच्या दारात आहे. आबोली आणि भुभूला जवळ घेतलंय. टेकअवे कॉफीच्या कप्सने दोघे चीअर्स करतायत. सगळे जण जमलेत. आजोंबा हॉस्पिटलमधून आलेत. त्यांच्या डोक्याला छोटसं बँडेज आहे. आजोबा त्याच्याकडे पहातात.

आजोबाः एखादया लेखकाच्या आयुष्यात क्वचित असं पात्र सापडतं जे लेखकाला लिहीण्याची प्रेरणा देतं. तू तसा सापडलायस मला फा फे. तुझं हे साहस आता मी सांगणार सगळयांना. कारण आजच्या युगाची खरीखुरी साहसकथा बघायलाच नाही तर जगायला लावलीयेस तू मला. ॲण्ड यू आर नॉट जस्ट फास्टर बरंका, यू आर ब्रायटर ॲण्ड चॅप्टर पण!

(सगळे हसून गेटबाहेर येतात. रिक्षा गेटपाशी येते.)

अंबादासः अंबादास म्हणला आज नाही रिव्हर्स घेणार तर कधी?

(बनेश बसतो.)

भुभूः सरळच घ्या हां आता!

अंबादास त्याच्याकडे चिडून पहातो. बनेश रिक्षात बसतो. इकडे आजोबा खिडकीत येऊन बसतात. आता आजोबा आणि तो एकमेकांकडे पहातात. दोघंही इमोशनल झालेत. बनेश टॉक्क! असा आवाज करतो. आजोबा उत्साहानं डेस्कवरचं पेपर पेन काढतात. त्याच्याकडे पहात रहातात. कागदाकडे पहातात. रिकाम्या कागदावर आपल्याला लिहीलं जाताना दिसतं. ‘फास्टर फेणे आणि पहिली परिक्षा’)

क्षितिज पटवर्धन

८ ऑक्टोबर २०१६, दुपारी ४ वाजून ३५ मिनिटे.